रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २५८
www.ramprahar.com
# रामप्रहर
रविवार, ६ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग
पेण तालुक्याला वादळी पावसाचा तडाखा/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
पाकिस्तानची हाराकिरी सुरूच; न्यूझीलंडकडून व्हाईटवॉश/८

## नक्षलवाद्यांनो शस्त्रे टाका व मुख्य प्रवाहात या -ना. अमित शाह



**दंतेवाडा** : जे नक्षलवादी आहेत त्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात यावे. जे नाही करणार त्यांना सुरक्षा दलाशी सामना करावा लागेल. शस्त्राच्या बळावर आदिवासींचा विकास रोखू शकत नाही. तुम्ही शस्त्रे टाका आणि मुख्य प्रवाहात, या असे आवाहन करीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुढच्या चैत्र नवरात्रीपर्यंत बस्तरमधील लाल दहशत संपवून टाकण्याचा इशारा दिला आहे. ते शनिवारी (दि. ५) छत्तीसगडच्या दंतेवाडा येथील बस्तर पंडुम महोत्सवाच्या समारोपात बोलत होते. तो काळ गेला जेव्हा बस्तरमध्ये गोळ्या चालत होत्या, बॉम्बस्फोट व्हायचे. आता सर्वांनी शस्त्रे सोडून विकासाच्या मुख्य प्रवाहात या. कुणी कुणाला मारू इच्छित नाही. परिसराचा विकास करायचा आहे, जो मागील ५० वर्षात झाला नाही. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी पाच वर्षात बस्तरला सर्व काही देतील, असेही ना. शाह म्हणाले.

# मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम जाहीर

### तरुणांना प्रशासनासोबत काम करण्याची संधी



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील तरुणांना प्रशासनासोबत काम करण्याचा अनुभव मिळावा व त्यासोबतच त्यांच्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या कक्षा रूंदावण्यास मदत व्हावी; तरुणांमधील कल्पकता व वेगळा विचार मांडण्याची क्षमता, उत्साह, तंत्रज्ञानाची आवड यांचा उपयोग प्रशासनास व्हावा आणि या माध्यमातून प्रशासकीय प्रक्रियांमध्ये गतिमानता यावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२५-२६ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार या कार्यक्रमात ६० फेलोंची निवड करण्यात येणार आहे.

फेलोंच्या निवडीसंदर्भातील निकष, नियुक्तीसंदर्भातील अटी व शर्ती तसेच शैक्षणिक संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमाची रूपरेषा व अंमलबजावणीबाबत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत हा कार्यक्रम सुरू करण्यात आला व यशस्वीपणे राबविण्यात आला. त्यानंतर २०२३-२४ या कालावधीतील कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्यानंतर आता २०२५-२६साठी हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत केली जाईल.

ऑनलाईन परीक्षा देण्याची कार्यपद्धती संचालनालयाच्या mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल व त्यातील अटी व शर्तींचे उमेदवाराने पालन करणे आवश्यक राहील. यापूर्वी मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमात काम केलेले फेलो पुनश्चः या कार्यक्रमांतर्गत फेलो निवडीसाठी पात्र असणार नाहीत.

**छात्रवृत्तीच्या स्वरूपात मिळणार मानधन**

मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम अंतर्गत फेलोंची नियुक्ती १२ महिने कालावधीसाठी असेल. यामध्ये वाढ करण्यात येणार नाही तसेच फेलो रूजू झाल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांनी त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. या कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या फेलोंना दरमहा मानधन ५६,१०० रुपये आणि प्रवासखर्च ५,४०० रुपये असे एकत्रित ६१,५०० रुपये छात्रवृत्तीच्या स्वरूपात देण्यात येणार आहेत.

# उरणमध्ये शेकापला हादरा!

## युवा नेते निलेश म्हात्रे यांच्यासह कार्यकर्ते भाजपत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण पूर्व विभागातील शेकापचे युवा नेते निलेश म्हात्रे यांच्यासह माजी पं.स. सभापती समिधा निलेश म्हात्रे तसेच आवरे येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी शुक्रवारी (दि. ४) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे उरणमध्ये शेकापला हादरा बसला आहे. भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष व माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते त्यांना पनवेलमध्ये झालेल्या कार्यक्रमात प्रवेश देण्यात आला.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार सुरेश लाड, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, उरण अध्यक्ष रवी भोईर, खालापूर अध्यक्ष प्रवीण मोरे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते. (पान २ वर..)



> लोकनेते दि.बा. पाटीलसाहेबांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात इच्छा असूनही आम्हाला सहभागी होता येत नव्हते. सद्यस्थितीत शेतकरी कामगार पक्ष काहीसा हतबल झाल्यामुळे आमच्यासारख्या चळवळीतील कार्यकर्त्यांना बंधने येत होती. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाने केलेला विकास व देशाची प्रगती पाहून आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, युवा नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश केला असून पक्ष नेतृत्व देईल ती जबाबदारी सक्षमपणे पार पाडू.
>
> **-निलेश म्हात्रे**, युवा नेते, उरण पूर्व विभाग



### अश्विनी बिद्रे खून प्रकरणाचा निकाल

## बडतर्फ पोलीस निरीक्षक अभय कुरूंदकर दोषी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे-गोरे खून प्रकरणात बडतर्फ पोलीस निरीक्षक अभय कुरूंदकर हाच मुख्य आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्यासह साथीदार कुंदन भंडारी आणि महेश पाटील दोषी ठरले, तर राजेश पाटील उर्फ राजू पाटील याची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

मूळच्या कोल्हापूरमधील आळते गावच्या रहिवासी अश्विनी बिद्रे-गोरे यांची २०१५मध्ये नवी मुंबई आयुक्तालय अंतर्गत कळंबोली पोलीस ठाण्यात बदली झाली होती, मात्र त्या कळंबोली पोलीस ठाण्यात रूजू झाल्याच नाही. दीड वर्षापासून त्या बेपत्ता होत्या.

सांगलीत असताना अश्विनी बिद्रे-गोरे यांची पोलीस निरीक्षक अभय कुरूंदकर याच्याशी ओळख झाली होती. त्याने त्याच्या मीरा रोड येथील घरी अश्विनी यांचा निर्घृण खून केल्याचा तसेच सहकाऱ्याच्या मदतीने मृतदेहाचे तुकडे करून वसईच्या खाडीत फेकून दिल्याचा आरोप होता.

सरकारच्या वतीने ॲड. प्रदीप घरत यांनी काम पाहिले, तर सहाय्यक पोलीस उपायुक्त तथा मुख्य तपास अधिकारी संगीता शिंदे अल्फान्सो यांनी तपास करून दोषारोपपत्र दाखल केले होते. आता तिन्ही आरोपींना ११ एप्रिल रोजी शिक्षा सुनावण्यात येणार आहे.

## दोन चिमुकलींचा दूषित पाण्यामुळे मृत्यू

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापुरातील बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत दूषित पाण्यामुळे दोन शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून एक मुलगी गंभीर आहे.

भाजप आमदार देवेंद्र कोठे आणि महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी घटनास्थळी भेट दिली. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधित मुलींचा मृत्यू डेंग्यूमुळे झाल्याची प्राथमिक माहिती दिली आहे.

## निवडक

### मुख्यमंत्र्यांनी घेतली पुण्यातील मयत महिलेच्या कुटुंबियांची भेट

**पुणे** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात उपचारांअभावी मृत्यू झालेल्या गर्भवती महिलेच्या कुटुंबियांची शनिवारी (दि. ५) भेट घेतली. आमदार अमित गोरखेदेखील उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्र्यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील कालचा प्रकार असंवेदनशीलच होता. जिथे चूक आहे तिथे चूक म्हणावे लागेल, अशा शब्दांत रुग्णालय प्रशासनाचे कान टोचले.

### दिल्ली कॅपिटल्सचा चेन्नई सुपर किंग्सवर विजय

**चेन्नई** : आयपीएलमध्ये शनिवारी (दि. ५) दिल्ली कॅपिटल्स संघाने चेन्नई सुपर किंग्सचा २५ धावांनी पराभव केला. यासह दिल्लीने विजयाची हॅट्ट्रिक साधली आहे. सीएसकेला त्यांच्या घरच्या मैदानावर पुन्हा एकदा पराभवाला सामोरे जावे लागले. दिल्लीने १५ वर्षांनंतर चेपॉकच्या मैदानावर विजयाची नोंद केली. त्यांनी दिलेल्या १८४ धावांचा पाठलाग करताना चेन्नई संघ २० षटकांत पाच विकेट्स गमावत १५८ धावाच करू शकला.

# पनवेल मनपा क्षेत्रातील वन विभागाच्या जागेसंदर्भात विकासकामांच्या अनुषंगाने चर्चा

## वनमंत्री गणेश नाईक यांच्यासोबत मंत्रालयात बैठक



**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वनविभागाच्या जागेसंदर्भात विकासकामांच्या अनुषंगाने परवानगी व तत्सम विषयावर चर्चा करण्यासाठी मंत्रालयात राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. ४) बैठक झाली. या वेळी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे ना. गणेश नाईक यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना आश्वासित केले.

पनवेल महापालिका क्षेत्रात अमृत अभियान अंतर्गत पाणीपुरवठा आणि मलनिःसारण योजनेची कामे प्रगतिपथावर आहेत. या योजनेतील जलवाहिनी, मलवाहिनी अंथरणे तसेच मलनिःसारण केंद्र बांधण्याकरिता जागेची आवश्यकता आहे तसेच बांधकाम विभागांतर्गतदेखील रस्ते क्राँकीट करणे, गटार, स्मशानभूमी, संरक्षक भिंत आणि नवीन रस्ते तयार करण्याची कामे वन विभागांतर्गत येत आहेत. त्यामुळे विकासकामे करण्यासाठी समस्या उद्‌भवत असून नागरिकांना सोयीसुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. हे विषय मार्गी लावण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने मंत्रालयात वनमंत्री गणेश मंत्री यांच्यासोबत गुरुवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी पनवेल महापालिका क्षेत्रातील वनविभागाच्या जागेसंदर्भात चर्चा करण्यात आली. बैठकीला महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. वनमंत्री गणेश नाईक यांनी बैठकीला सकारात्मक प्रतिसाद देत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

## महाडमध्ये लाचखोर तलाठी, मंडळ अधिकारी जेरबंद

**महाड : प्रतिनिधी**

एका शेतकऱ्याला सातबारा उताऱ्यावर नोंद करून देण्यासाठी तीन हजार रुपयांची लाच स्वीकारताना महाड तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यास शुक्रवारी (दि. ४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले व ताब्यात घेतले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार महाड तालुक्यातील वरंडोली येथील एका शेतकऱ्याने गट/सर्वे नंबर २९८मधील आपल्या खरेदी केलेल्या जागेची नोंद सातबारा उताऱ्यावर करण्यासाठी तलाठी कार्यालयात अर्ज दिला होता. ही नोंदणी करण्यासाठी संबंधित तलाठी व मंडळ अधिकाऱ्याने तीन हजार रुपयांची मागणी केली असता शेतकऱ्याने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार या विभागाच्या पथकाने शुक्रवारी दुपारी २.३०च्या सुमारास महाड शहरात सापळा रचून तलाठी व मंडळ अधिकारी या दोघांनाही लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

सुरज मोहनलाल पुरोहित (वय ३५, तलाठी नाते, अतिरिक्त कार्यभार चापगाव) आणि भगवान तेजराव मोरे (वय ५६, मंडळ अधिकारी, मंगरूळ, अतिरिक्त कार्यभार नाते, वरंडोली) अशी लाचखोरांची नावे आहेत. याबाबत अधिक तपास सुरू आहे.

### सदिच्छा भेट



**पनवेल : नवीन पनवेल सेक्टर ७मधील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राच्या सदस्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन समस्या मांडत चर्चा केली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आर्थिक सहाय्य करणार असल्याची ग्वाही दिली. या वेळी भाजप नेते जितेंद्र तिवारी, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे अध्यक्ष चंद्रकांत म्हात्रे, सचिव गणपत माने, खजिनदार दामोदर भोपी, सहखजिनदार अंबाजी कोळी, गजानन म्हात्रे, बापू साळवे, भाऊसाहेब घुळे, पांडुरंग पाटील, रायथार गुप्ता, राजबीर वाल्मिकी, आशा शेट्टी, सुशील माने आदी उपस्थित होते.**

## मराठीसक्तीवरून मनसेची माघार

**मुंबई : प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात आपल्या कार्यकर्त्यांना बँकांमध्ये जाऊन तेथील कामकाज मराठी भाषेत होत आहे की नाही हे तपासण्यास सांगितले होते. त्यानंतर मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात मनसे कार्यकर्ते कामाला लागले होते, मात्र आता आता राज ठाकरे यांनी आता कार्यकर्त्यांना तुर्तास थांबवण्यास सांगितले आहे.

मनसेच्या आक्रमक पवित्र्यानंतर बँक कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून सुरक्षेची मागणी केली होती. यावर मुख्यमंत्र्यांनी, मराठी भाषेचा आग्रह धरण्यात गैर काहीच नाही, मात्र जर कोणी कायदा हातात घेतला तर हे खपवून घेतले जाणार नाही आणि योग्य ती कारवाई केली जाईल, असे म्हटले होते. यानंतर काही तासांतच राज ठाकरेंनी आंदोलन थांबवण्याच्या कार्यकर्त्यांना सूचना दिल्या आहेत.

## रेल्वेगाडीवर अज्ञाताने दगड मारल्याने तरुणी जखमी

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या कल्याण आणि विठ्ठलवाडी रेल्वेस्थानकांदरम्यान चेन्नई सुपरफास्ट एक्स्प्रेसवर अज्ञाताने दगड मारल्याने एक तरुणी जखमी झाली आहे. ही घटना शुक्रवारी (दि. ४) रात्री आठच्या सुमारास घडली. तेजस्विनी बाळाराम भोईर (वय २४, रा. कर्जत) असे जखमी तरुणीचे नाव असून तिच्या डोक्याला मार लागला आहे.



तेजस्विनी भोईर ठाणे येथे कामानिमित्ताने गेली होती. घरी परतण्यासाठी ती ठाणे रेल्वेस्थानकातून चेन्नई सुपरफास्ट एक्सप्रेसमध्ये बसून निघाली असताना विठ्ठलवाडीजवळ अज्ञाताने दगड फेकला. हा दगड एक्सप्रेसमध्ये बसलेल्या तेजस्विनीच्या डोक्याला लागल्याने ती जखमी झाली. सुरुवातीला ट्रेनमध्ये असणाऱ्या प्रवाशांनी चेन खेचून ट्रेन अंबरनाथ रेल्वेस्थानकात थांबवली. या वेळी तेजस्विनीवर रेल्वे विभागाकडून प्राथमिक उपचार करून पुढील प्रवास करून कर्जत उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेण्यास सांगितले.

याबाबत कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात रात्री उशिरा तरुणीचा जबाब नोंदवून घेत अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला असून कल्याण रेल्वे पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

दरम्यान, कल्याण रेल्वेस्थानक परिसरात शुक्रवारी दिवसभरात ट्रेनवर दगडफेकीच्या तीन घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. ही दगडफेक नेमकी कुठल्या कारणाने करण्यात आली हे अद्याप समोर आले नसले तरी कल्याण आणि उल्हासनगर रेल्वे परिसरात राहत असलेल्या झोपडीधारकांवर रेल्वे प्रशासनाने कारवाई केली. त्यातूनच हा प्रकार घडला असावा असा अंदाज लावण्यात येत आहे, मात्र धावत्या रेल्वेगाडीवर दगड फेकून मारण्याच्या घटना नवीन नसून यामुळे प्रवाशांना नाहक फटका बसत आहे.

# निवडक

## पनवेलमधून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक विवाहिता महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पुजा पुरण गोस्वामी (रा.साईबाबा मंदिर समोरील चाळ, पनवेल) अंगाने मजबूत, रंगाने निमगोरी, चेहरा गोल, नाक सरळ, उंची पाच फुट, डोक्याचे केस काळे असून अंगात पंजाबी ड्रेस व सलवार घातलेला आहे. तिला गुजराती भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पो.उपनि.हनुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




## अल्पवयीन मुलाला अज्ञाताने पळवले

**पनवेल :** एका अल्पवयीन मुलास अज्ञाताने फुस लावून पळवून नेल्याची घटना जावळे गाव येथे घडली आहे. दक्ष किशोर बांगडा (१३ वर्षे चार महिने) उंची चार फुट पाच इंच, रंग सावळा, चेहरा उभट, बांधा मध्यम, केस काळे, नाक सरळ असून अंगात फुल बाह्याचा काळ्या रंगाचा शर्ट व फुल जिन्स पॅन्ट तसेच काळ्या रंगाची सॅण्डल पायात घातलेली आहे. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे किंवा सहा.पो.नि.सुषमा पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## दापिवली येथून युवक बेपत्ता

**मोहोपाडा :** दापिवली येथून ३१ वर्षीय दिनेश जगदीश चौधरी राहत्या घरातून कोठेतरी निघून जाण्याची घटना घडली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार हवालदार पानपट्टे याचा तपास चालू आहे. याबाबत रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दिनेश जगदीश चौधरी याने आपल्या दुकानातील डायरीत चिट्ठीत लिहून ठेवले आहे की, पप्पा मी जीवनाला कंटाळलो असून माझ्यावर खूप कर्ज झाले आहे. त्यामुळे मी दुनिया सोडून जात आहे. मला माफ करा. मी सर्वकाही खतम करून जात आहे, असे लिहून ठेवून कुठेतरी निघून गेला. त्याचे वर्णन अंगाने मध्यम, उंची पाच फूट दोन इंच, चेहरा गोल, डोळे काळे, केस डोक्याला समोर ठक्कल पडलेले, अंगात नेसून गडद निळ्या रंगाचा टी-शर्ट व फिक्कट पांढऱ्या रंगाची पँट, डाव्या हातावर Dany असे लिहिलेले असून या वर्णनाची व्यक्ती कोणास आढळल्यास तत्काळ रसायनी पोलीस ठाण्यात संपर्क करावा, असे आवाहन रसायनी पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आले आहे.



# पेण तालुक्याला वादळी पावसाचा तडाखा

**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये शुक्रवारी (दि.४) सायंकाळी अचानक आलेल्या अवकाळी वादळी-वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे तालुक्यातील शेती, उद्योग व घरांची पडझड झाली असून महावितरणचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली होती अवघ्या एक ते दीड तास पडलेल्या पावसामुळे शहरातील रस्ते जल्मय झाले तर खरेदीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांना मोठे हाल सोसावे लागले. या वेळी अनेक ठिकाणी पावसाचे पाणी रस्त्यावर येऊन वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. चिंचपाडा उर्दू शाळा, विक्रम स्टँड, राजू पोटे मार्ग, जुना आरटीओ परिसरात पाणी साचल्यामुळे वाहनचालकांना अडचणीचा सामना करावा लागला. वादळी वाऱ्या पावसामुळे घरावरील इमारतील पत्रे उडाले असून कासारआळी तसेच नाक्यावरील पंचरत्न बिल्डींग येथील एका गाळ्याची शेड संपूर्ण कोसळली होती. आरटीओ कार्यालयाजवळ मोठे झाड रस्त्यावर पडल्याने वाहतूक ठप्प झाली होती काही भागात लाईटचे काम कोसळल्यामुळे रात्री उशिरापर्यंत विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता.

अवकाळी पावसाचा फटका नुसता शहरालाही बसला नसून ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. खरोशी शिवचंद्र गावंड आणि कृष्णा घरात यांच्या घराचे पत्रे उडून गेले आणि राजे प्राथमिक शाळा खरोशीच्या इमारतीची कौलेदेखील उडाली होती, पूर्व विभागातील जावळी गावातील अनेक घरांचे पत्रे उडाले तर काही घरांच्या भिंत कोसळून नुकसान झाले आहे. जावळीतील राजिप अंगणवाडीशाळेचे पत्रे उडाले असून तालुक्यातील गणेश मूर्तिकार, आंबा बागायतदार, वीटभट्टी व्यावसायिक व मीठ उत्पादकांचे मोठे नुकसान झाल्याने स्थानिकांना आर्थिक फटका बसला आहे.

प्रसिद्ध असलेल्या बद्रुद्दीन दर्गेच्या परिसरातील शेड पडली असून येथील कमानीचे व परिसराचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. प्रशासनाने नुकसानग्रस्त भागांचा आढावा घेऊन तत्काळ दखल घेण्याची मागणी ग्रामस्थांनी केली असून मदतीच्या अपेक्षेने नागरिक प्रशंसानाकडे आशेने पाहत आहेत.

### 'अवकाळी'मुळे शेती, उद्योग व घरांचे नुकसान







# शासकीय शाळांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणार -मंत्री तटकरे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बीपीसीएलच्या सीएसआर निधीच्या माध्यमातून रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या हद्दीतील नऊ शाळांमध्ये ११० संगणक ६० डिजिटल स्मार्ट बोर्ड्स लावण्यात आले आहेत. ही केवळ सुरुवात असून, भविष्यात आणखी उपक्रम राबवून शासकीय शाळांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी रोहा येथील डॉ. सी डी देशमुख माध्यमिक विद्यालय येथे केले.




या वेळी तटकरे यांनी सांगितले की, ही संकल्पना खासदार सुनील तटकरे यांची असून, आम्ही सदैव शैक्षणिक क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देत आहोत. जे पूर्वीच्या पिढीला मिळाले नाही, ते आजच्या पिढीला द्यावे, ही आमची मानसिकता आहे. आजच्या काळात खासगी शाळांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण हे मराठी व सेमी इंग्लिश माध्यमाच्या शाळांमधूनही मिळायला हवे, यासाठी हे पाऊल उचलले आहे. अशा उपक्रमांमुळे पालक व विद्यार्थी वर्ग यांचा विश्वास अधिक वाढेल.

खासदार तटकरे यांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या विविध समित्यांवर काम करत असताना, केवळ पेट्रोलियम क्षेत्रातील प्रकल्प व्यवस्थापन किंवा रोजगार निर्मिती नव्हे, तर कंपन्यांच्या समाजिक दायित्व निधी (CSR)चा वापर शैक्षणिक, क्रीडा आणि सामाजिक उपक्रमांसाठी कसा करता येईल, यावरही त्यांचा विशेष भर आहे.

या उपक्रमांतर्गत, जवळपास एक कोटी ९० लाख रुपयांचा खर्च करून केवळ डिजिटल बोर्ड्सच नव्हे, तर सर्व शाळांमध्ये सुसज्ज कॉम्प्युटर लॅब्ससुद्धा उभारण्यात आल्या आहेत. यामुळे नगर परिषदेच्या 'क वर्ग' मधील शाळा एकाच वेळी डिजिटल शिक्षण प्रणालीसह सुसज्ज करणारी पहिली रोहा नगर परिषद ठरली आहे. या वेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी रोहा-अष्टमी नगर परिषद, अजयकुमार एडके, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, रोहा अष्टमी नगरपरिषदचे सर्व अधिकारी आदी उपस्थित होते.

# सीबीडीत आज भाजप स्थापना दिवस कार्यक्रम

## आमदार मंदा म्हात्रे यांची लाभणार उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतातील सर्वात मोठा पक्ष ओळखला जाणारा म्हणजे भारतीय जनता पक्ष, तसेच भारतीय जनता पक्षाचा ४५वा स्थापना दिवस बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या नेतृत्वात रविवारी (दि.६) दुपारी १ वाजता सीबीडी येथील वारकरी भवन, सेक्टर ३ए, येथे भारतीय जनता पार्टीच्या हजारो कार्यकर्त्यांसमवेत साजरा केला जाणार आहे.

याचबरोबर महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संघटन-पर्व संवादमार्फत कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. तसेच भारतीय जनता पक्षाच्या ४५व्या स्थापना दिवस निमित्त १५१ बेलापूर मतदारसंघात अनेक ठिकाणी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहेत.

भारतीय जनता पक्षाची कारकीर्द सुरू झाली तेव्हा कोणीही विचार केला नव्हता की एके दिवशी भाजपला देशातील जनतेकडून प्रचंड बहुमत मिळेल, परंतु देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या नावाने हे सर्व करून दाखविले. भाजपने देशात स्पष्ट बहुमताचे सरकार स्थापन केलेच नाही तर देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणूनही उदयास आला.

पक्ष स्थापना दिनानिमित्त भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याने संघटन पर्वात घेतलेल्या परिश्रमाचा जो अविष्कार आपण १.५ कोटी सभासद करून दाखवलेला आहे त्याचा ही जल्लोष, आनंद साजरा केला जाणार आहे.

# महापारेषणतर्फे अत्याधुनिक डिजिटल वजनकाट्याची उभारणी

**मुंबई : प्रतिनिधी**

स्क्रॅप मोजणी व विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी महापारेषण कंपनीच्या वाशी परिमंडळाने एक पाऊल पुढे टाकले आहे. महापारेषण कंपनीच्या इतिहासात प्रथमच वाशी परिमंडळाने कळवा संकुलात ६० मेट्रिक टन क्षमता असलेल्या अत्याधुनिक डिजिटल वजनकाटच्याची उभारणी केली आहे.



कळवा संकुलात असलेल्या व सर्वत्र विखुरलेल्या जुन्या एम.एस., जीआय सामानाचे, कंडक्टरचे वजन करुन स्क्रॅपिंग प्रस्ताव तयार करणे फार अडचणीचे होते. तसेच अति उच्च दाब वाहिन्यांचे जुने कंडक्टर बदलण्याचे काम कळवा मंडल अंतर्गत प्रगतिपथावर आहे. या जुन्या कंडक्टरचे बाहेरील वजन काटयाचे वजन पुनर्तपासणीकरिता देखील अडचणी येत होत्या. त्यामुळे येथे महापारेषणचा स्वतःचा वजन काटा प्रस्थापित करण्याची गरज होती.

या वजनकाटयामुळे स्क्रॅप मोजणी व विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, कळवा संकुलात असलेल्या जुन्या एमएस, जीआय सामानाचे, कंडक्टरचे अचूक वजन करुन त्याची योग्य भावात विक्री करणे, स्क्रॅपिंगची वेगवान प्रक्रिया राबविणे शक्य होणार आहे.

या वजन काटच्याच्या उभारणीसाठी संचालक (संचलन) सतीश चव्हाण व वाशी परिमंडळ मुख्य अभियंता महेश भागवत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच कळवा मंडळाचे अधीक्षक अभियंता विजय आवारे यांच्या प्रयत्नाने आणि कार्यकारी अभियंता संतोष भुजबळ, अतिरिक्त कार्यकारी अभियंता परेश पवार यांच्या देखरेखीखाली या वजनकाट्याची यशस्वीरित्या उभारणी करण्यात आली. या कामात मेसर्स. टेक इन्फिनिटीचे महेश शिंदे यांचेही मोलाचे योगदान लाभले.

# नागोठणे गवळआळीतील श्री राधाकृष्ण साईबाबा मंदिर परिसर झाला चकाचक





**नागोठणे : बातमीदार**

रामनवमी उत्सवानिमित्त रविवारी (दि. ६)नागोठणे येथील गवळआळी मधील श्री राधाकृष्ण गणपती साईबाबा मंदिरात मंदिराचे विश्वस्त गवळआळी ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष नागोठणेचे कर्तव्यदक्ष माजी सरपंच विलास चौलकर यांच्या मार्गदर्शखाली रामनवमी उत्सव साजरा करण्यासाठी जय्यत तयारी सुरु असून श्री साईबाबांच्या पालखी सोहळ्यासाठी ग्रामस्थ उत्साही आहेत.

याच अनुषंगाने शुक्रवारी (दि. ४) विलास चौलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गवळआळीतील महिला मंडळाने मंदिर व मंदिर परिसराची साफसफाई करून परिसर चकाचक केल्यानंतर विलास चौलकर यांच्या वतीने सर्व महिलांना आप्लोपहार देण्यात आला. साफसफाई करताना महिला मंडळासह मंदिराचे विश्वस्त गवळआळी ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष तथा श्री अष्टविनायक पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर, श्री अष्टविनायक पतसंस्थेचे संचालक सखाराम ताडकर, माजी सरपंच मधुकर चौलकर, नाना पवार, पंकज चौलकर आदी ग्रामस्थ सहभागी झाले होते.

रामनवमी उत्सवानिमित्त रविवारी (दि. ६) श्री राधाकृष्ण गणपती साईबाबा मंदिरात संपूर्ण दिवसभर धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. सायंकाळी ६ वाजता श्री साईबाबांची पालखी सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. मंदिरातून पालखी निघाल्यानंतर संपूर्ण गवळआळीत पालखी फिरवली जाणार असून घराघरासमोर पालखी गेल्यानंतर पालखीचे दर्शन घेतले जाणार असून रात्री ९ वाजता पालखीचे पुन्हा मंदिरात आगमन होणार असून तदनंतर आरती संपन्न झाल्यानंतर सर्व ग्रामस्थ व उपस्थित मान्यवरांनी महाप्रसादाचा लाभ घेल्यानंतर उस्तवाची सांगता होणार असल्याची माहिती विलास चौलकर यांनी दिली आहे.

# बँकांना मराठीतून कारभाराच्या सूचना

**रसायनी : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने मराठी भाषेला २०२४ला अभिजात भाषेचा दर्जा दिला असतानासुद्धा अनेक राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मराठीमध्ये कामकाज होताना दिसत नाही. मराठीचा मान आपण सर्वांनी योग्य प्रकारे राखणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या आवाहनापूर्वी रसायनी परिसरातील सर्व बँकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे पत्रक देण्यात आले.

सुचित करण्यात आले की, आपल्या आस्थापनामध्ये आपले पदाधिकारी व कर्मचारी यांनी सर्व व्यवहार मराठीमध्ये करावा. अन्यथा मनसे तर्फे उग्र आंदोलन छेडले जाईल.

या वेळी मनसेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष दीपक कांबळी, पं. समिती विभाग अध्यक्ष प्रशांत खरात, माजी पं.स. अध्यक्ष भास्कर डुकरे, मनोज जाधव, संजय पाटील उपस्थित होते



## अमृत पाटील यांची निवड

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचे तिसरे आंतरराष्ट्रीय आगरी अस्मिता साहित्य संमेलन ११ एप्रिल २०२५ रोजी भूतान येथे होत आहे.



या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, गीतकार, सिने संगीतकार अमृत पाटील-नेरूळकर यांची निवड झाली आहे तर कथाकार, दिग्ददर्शक गजानन म्हात्रे यांची कार्याध्यक्ष तर ज्येष्ठ साहित्यिका, कवयित्री स्मिता वाजेकर यांची उदघाटक म्हणून निवड झाल्याचे अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचे अध्यक्ष कैलास पिंगळे यांनी जाहीर केले आहे. स्वागताध्यक्ष म्हणून कैलास पिंगळे हे स्वतः जबाबदारी पार पाडणार आहेत.

भूतानची राजधानी थिंपू येथे होत असलेल्या या एक दिवसीय साहित्य संमेलनात आगरी बोली भाषेवर परिसंवाद, साहित्यिक चर्चा, कवी संमेलन, पुस्तक प्रकाशन व संगीतमय कवितेचा जागर असे अनेक कार्यक्रम होणार आहेत, असे अध्यक्ष, कैलास पिंगळे यांनी कळविले आहे.

दरम्यान, नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागात कला शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या अमृत पाटील यांची या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने विशेषतः येथील शिक्षक आणि साहित्यिक वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अमृत पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पान १ वरुन

## उरणमध्ये शेकापला हादरा!

या वेळी शेकाप नेते निलेश म्हात्रे यांच्यासह समिधा म्हात्रे, आवरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भार्गव ठाकूर, प्रगती म्हात्रे, बाळू जनार्दन गावंड, माजी उपसरपंच मनोज गावंड, ग्रामपंचायत सदस्य अविनाश गावंड, रोहन गावंड, अनंत गावंड, अनंत कडू, नामदेव म्हात्रे, प्रदीप म्हात्रे, सोमनाथ म्हात्रे, दिनानाथ गावंड, आर्यन भोईर, माजी सदस्य चंद्रशेखर थळी, राजेंद्र म्हात्रे, आवरे माजी शाखाप्रमुख पद्माकर गावंड यांनी त्यांच्या समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला.

## मोरा येथे एकवीरा देवीची पालखी

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोरा कोळीवाडा गावाची आराध्य दैवत व जागृत देवी एकवीरा देवीची यात्रा पालखी शुक्रवारी (दि. ४) मोठ्या उत्सवात झाली.



सोहळ्याचे आयोजन एकविरा देवी सामाजिक विकास संस्था मोरा कोळीवाडा यांनी केले होते. अध्यक्ष प्रदीप कोळी, उपाध्यक्ष शर्मिल कोळी, संपर्क प्रमुख प्रशांत कोळी, कार्याध्यक्ष राकेश कोळी व सहकार्य सभासद निलेश कोळी, प्रवीण कोळी, निश्चल कोळी, मयूर पांचाळ, मनोज कोळी, निवृत्ती कोळी, प्रीतम कोळी, हेमंत कोळी, दीपक मेस्त्री वीरेंद्र कोळी, रामेश कोळी, अभिषेक कोळी, धर्मा कोळी आदींचे या उत्सवासाठी सहकार्य मिळाले.

# उरण द्रोणागिरी साऊथ इंडियन ग्रुपतर्फे महिलासांठी कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

उरण द्रोणागिरी साऊथ इंडियन ग्रुपच्या वतीने महिलांसाठर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्या सामाजिक कार्यकर्त्या ममता म्हात्रे होत्या. त्या सोबतसामाजिक कार्यकर्त्या सुजाता गायकवाड, लेजी वर्गेस व उरण द्रोणागिरी साऊथ इंडियन ग्रुप संस्थापक निशा सुधीर आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. आलेल्या सर्व पाहुण्यांचे निशा सुधीर यांनी शाल व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.



कार्यक्रमात संसृतिक खेळ, नृत्य घेण्यांत आले. विजेत्या स्पर्धकांना बक्षीसे देवून गौरविण्यात आले. या वेळी पुष्पा कुरूप नंदिनी रवीन्द्रन, शिजा प्रसाद, बिना अनिल, अमृता अनिल आदींचे सहकार्य मिळाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृता अनिल यांनी केले तर आभार प्रदर्शन पुष्पा कुरूप यांनी केले. डॉ. ग्रीष्मा यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय तपासणी शिबिर घेण्यांत आले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम

## इनरव्हील क्लब पनवेलतर्फे उद्यानात बेंचेस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानाच्या सौंदर्यात भर टाकण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी इनरव्हील क्लब पनवेलने पार पाडली आहे. या उद्यानात येणाऱ्या मुलांसाठी चार बेंचेस तसेच आयडब्ल्यूसीचा लोगो लावण्यात आले आले असून यांचे उद्घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि.५) झाले.



या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष नगरसेवक अनिल भगत, पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, आय डब्ल्यू सी डिस्ट्रिक्ट थ्री वन थ्रीच्या डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. शोभना पालेकर, वर्षा ठाकूर, विलास चव्हाण, राकेश भुजबळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या प्रकल्पासाठी क्लब अध्यक्ष डॉ. विणा मनोहर, सुलभा निंबाळककर, वर्षा ठाकूर यांच्या सहकाऱ्यांनी भरपूर मेहनत घेऊन क्लबच्या नावलौकिकात भर टाकली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी क्लबच्या कार्याबाबत समाधान व्यक्त करून भविष्य काळातही क्लब कडून असे उत्तम उपक्रम होत राहतील अशा शुभेच्छा दिल्या. तसेच डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. शोभना पालेकर आणि पास्ट प्रेसिडेंट मीनल टिपणीस यांना पुस्तक भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## खारघरमध्ये आरोग्य दिनानिमित्त शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतीक आरोग्य दिनाचे आरोग्य दिनाचे औचित्यसाधून खारघरमधील स्पंदन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल आणि आयसीयू यांच्यावतीने ४ ते १० एप्रिलदरम्यान आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले.

या वेळी त्यांनी खारघर वासीयांची सेवा करत असताना समाजाला काही दिले पाहिजे या हेतूने आरोग्य शिबिराचे आयोजन केल्याबद्दल डॉक्टरांचे आभार मानले.





जागतिक आरोग्य दिन दरवर्षी ७ एप्रिल रोजी साजरा केला जातो. जागतिक आरोग्य दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून तो जगभरातील लोकांसाठी आरोग्याच्या महत्त्वावर विचार करण्याची आणि कृती करण्याची संधी आहे. या दिवशी आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांमुळे लोकांना आरोग्यविषयक माहिती मिळते आणि ते अधिक जागरूक होतात. त्यापार्श्वभुमीवर

खारघरमधील स्पंदन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल आणि आयसीयू यांच्यावतीने ४ ते १० एप्रिल दरम्यान आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराला नागरीकांचा चांगला प्रतिसाद लाभला असून १००हून नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. तसेच अश्या उपयुक्त उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल स्पंदन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल आणि आयसीयू आणि डॉक्टरांचे आभार मानले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल महापलिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी, शत्रुघ्न काकडे, निलेश बावीस्कर, डॉक्टर सुहास खरले, विकास भंगाळे, संजय चव्हाण, डॉ. शेहनवाज, सुधाकर थवई यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

## तळोजातून १८ लाखांचे अमली पदार्थ जप्त

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील कोयनावेळे गावातील अरिहंत अनायका गृहनिर्माण सोसायटीत राहणाऱ्या अहमद मोटलानी याच्याकडून १८ लाख ४५ हजार रुपये किमतीचा पांढरा मेफेड्रॉन नावाचा अमली पदार्थ गुन्हे शाखेने जप्त करून त्याला अटक केली आहे.

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार वरिष्ट पोलिस निरीक्षक संदीप निगळे यांनी तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक प्रवीण भगत यांच्या सहकार्याने कोयनावेळे गावात धाड टाकली. अमली पदार्थ विक्रेता अहमद फारुख मोटलानी राहत असलेल्या अरिहंत अनायका गृहनिर्माण सोसायटीतील चौथ्या मजल्यावरील ४०६ मध्ये पोलिसांनी घुसून छापा टाकला. त्यावेळी मेफेड्रॉन नावाचा पांढऱ्या रंगाचा अमली पदार्थ आढळून आला. बाजारात त्याची किंमत १८ लाख ४५ हजार असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

या कारवाई दरम्यान मोटलानीला पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली. त्यांना नुरी रिक्षावाला (रा. मुंब्रा) हा मोटलानीचा या धंद्यातील साथीदार हवा आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.



**पनवेल : भाजपचे युवा नेते विक्रम देशमुख यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी राहुल ठाकूर, आलोक कासुर्डे, संकेत शिंदे, सेहजाद्द शेख, गौरव शेडगे उपस्थित होते.**



**पनवेल : माजी सैनिकांना महापालिका मालमत्ता कर सवलत शासन निर्णयानुसार २०२०पासून लागू करण्यात यावी, अशी मागणी माजी सैनिक सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे करण्यात आली. या वेळी माजी सैनिक संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष वसंत धामणे, श्री. राजीवडे, संघटनेचे पदाधिकारी विद्यानंद महाडिक, कैलास पाटील, विश्वनाथ चव्हाण आदी उपस्थित होते.**

## संस्कार भारतीतर्फे १० एप्रिलला पनवेल येथे लेखन कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संस्कार भारती कोकण प्रांतच्या वतीने लेखकांना दिशा मिळावी याकरिता लेखन कार्यशाळेचे आयोजन गुरुवारी (दि.१०) पनवेल येथे सकाळी ९:३० ते सायंकाळी ५ वेळेत करण्यात आले आहे.

नवोदित लेखकांना लेखनाची कौशल्य आत्मसात करता यावीत, लेखनाचे वेगवेगळे आयाम समजून घेता यावे याकरिता संस्कार भारती, कोकण प्रांताने, लेखन-प्रेमीसाठी कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रमोद बापट यांच्या हस्ते करण्यात येणार असून कथा आणि कविता यासाठी दोन स्वतंत्र सत्र घेण्यात येणार आहे.

याकरिता डॉ. स्मिता दातार, प्रा. विक्रम परांजपे मार्गदर्शन करणार आहेत. कवी गीतकार प्राध्यापक प्रवीण दवणे यांची मुलाखत ही कार्यशाळेचे मुख्य आकर्षण असणार आहे. दुपारच्या सत्रात कवी संमेलन आयोजित केलेल्या असून कवीसंमेलनाचे अध्यक्ष साहित्य संस्कृती मंडळाच्या सेक्रेटरी मीनाक्षी पाटील या असणार आहेत.

श्री साई नारायण बाबा आश्रम, पनवेल (रेल्वे स्टेशन पासून केवळ ५ मि. चालत) होणारा हा कार्यक्रमासाठी संपर्क क्रमांक ९९२०२७१८२२, ८३६९१८५११५ आहेत, असे साहित्य विधा संयोजक ॲड. अपर्णा नाडगौडी यांनी सांगितले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्याबाबत नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसहभागातून महानगरपालिकेच्या सहकार्यातून १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पनवेल शहरामध्ये भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित नियोजन बैठकीत उत्सवाच्या सर्व तयारीची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

या वेळी अतिरीक्त आयुक्त सर्वश्री भारत राठोड, गणेश शेटे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, चारूशीला घरत, दर्शना भोईर, गणेश कडू, शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे,विविध संघटनेचे प्रतिनिधी उपायुक्त सर्वश्री कैलास गावडे, डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत,शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर,



आदी उपस्थित होते.

या वेळी मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, सुरक्षाव्यवस्था, स्वच्छता व विविध सुविधा याबाबत सविस्तर नियोजन करण्यात आले. मिरवणुकीसाठी रुग्णवाहिका, थंडपाणी, अल्पोपहार, एनर्जी ड्रिंक, सुरक्षा रक्षक, लाईट व्यवस्था आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जाणार असल्याची माहिती उपायुक्त गावडे यांनी दिली.

मिरवणूकीनंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या नूतनीकरणाचे भूमी पूजन व महापालिका मुख्यालयात प्रवेश द्वाराच्या बाजूला संविधान उद्देशिकेचे अनावरणही यावेळी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जयंती निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध, चित्ररथ, लेझीम व घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे व स्मृतिचिन्हे देण्यात येणार आहेत. शहरातील प्रमुख चौकांमध्ये फ्लेक्स, बॅनर व विद्युत रोषणाईसह आकर्षक सजावट केली जाणार आहे. आंबेडकर भवन ते शिवाजी महाराज पुतळा मार्गावरील दोन्ही बाजूंना लाईटची व्यवस्था करण्यात येणार असून सुरक्षिततेसाठी विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

या बैठकीत माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी महापालिकेतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत, तसेच जयंतीसंदर्भात विविध मागण्यांचाही महापालिकेने सकारात्मक पद्धतीने विचार केला असून त्याची अंमलबजावणी झाली आहे. याकरिता महापालिका प्रशासक मंगेश चितळे यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला तो सर्वांनुमते संमत झाला. तसेच महापालिका राबवित असलेल्या उपक्रमाबाबत बिनेदार यांनी समाधान व्यक्त करून आभार मानले.

### शहरात निघणार मिरवणूक

*जयंतीच्या दिवशी सकाळी ७ वाजता नागरिकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ एकत्र जमायचे असून, ७.३० वाजता पुष्पहार अर्पण, पूजा-पाठ व मानवंदना होईल. त्यानंतर पुतळ्याजवळून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, एम.टी. एन.एल. रोड, संत जगनाडे महाराज चौक, रोहिदास वाडा, टपाल नाका, कर्नाळा सर्कल, भाजी मार्केट, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, विरुपाक्ष मंदिर, लाईन आळी, गुणे हॉस्पिटल मार्गे आंबेडकर भवन येथे पोहचून समाप्त होईल.*

## जप्त केलेल्या वाहनांसंदर्भात पोलिसांकडून मालकांचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा हद्द परिसरात विविध गुन्ह्यातील केलेल्या वाहनांच्या मालकांचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत.

विविध गुन्हया मध्ये जप्त असलेली वाहने गेल्या बर्याच दिवसापासुन तळोजा पोलीस ठाण्याच्या आवारात पडुन आहेत. सदर गुन्हयातील जप्त वाहन मालकास नोटीस काढुन नोटीसची बजावणी केली असुन त्यांचा शोध घेतले असता ते मिळुन आले नाहीत. तरी सदर गुन्हयात जप्त असलेल्या वाहनांचे मालकाचा शोध होण्याकरीता तपास सुरू आहे.

यामध्ये सेंट्रो कार एमएच-०४-बीवाय-४६२५, पल्सर मोटार सायकल एमएच-४७-व्ही-४००० या वाहनांचा समावेश आहे. या संदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत, तळोजा पो. ठाणे दुरध्वनी क्रमांक ०२२/२७४१२३३३ मो. नं. ९८७०३०१०९०, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सागर निकम मो.नं. ९६२३४४५१००, पोहवा /१०७८ निवळे मो.नं ९०८२१२५१४१ यांचेशी व्यक्तीशाः अगर मोबाईल फोनवर संपर्क साधणे बाबत कळवावे.

## लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यांचा भोपाळमध्ये अभ्यास दौरा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, गणित व तंत्रज्ञानाबद्दल आवड निर्माण करून त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे या मुख्य उद्दिष्टनुसार राष्ट्रीय अविष्कार अभियान अंतर्गत माध्यमिक शिक्षण विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्यामार्फत विविध शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षा, विज्ञान प्रदर्शन, आदर्श शाळा यां मधील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्याबाहेरील मध्य प्रदेशातील भोपाळ येथे चार दिवसीय अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले गेले होते.

या अभ्यास दौऱ्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि. बा.पाटील विद्यालय कामोठेमधील इयत्ता नववीमधील श्रेयश कदम, सत्यम धुमाळ, शिवांश कांबळे, सिद्धी कदम, श्रेया जाधव या पाच विद्यार्थ्यांची निवड झाली होती. सहलीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक, भाषा समृद्धीकरणाला चालना मिळेल अशा ठिकाणांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी मिळाली.संभाजीनगर येथे आंग्ल भाषा केंद्र, इंदोर येथील महेश्वर मंदिर, पुण्यश्लोक



अहिल्याबाई होळकर यांचा किल्ला आणि वाडा, तिथल्या प्रसिद्ध माहेश्वरी साड्यांचे विणकाम, जीवनदायीनी व पवित्र अशा नर्मदा नदीचे दर्शन, भोपाळ येथील शांतीचा संदेश देणारे बुद्ध मंदिर, सांची स्तूप, भारावून टाकणारे कर्कवृत्त, विथी संग्रहालय, विज्ञान पार्क, प्रचंड मोठी असणारी ताजुल मस्जिद, डोळ्यात मावणार नाही एवढा मोठा राजा भोज तलाव, वनविहारांमध्ये असणारे वन्यप्राणी, तसेच भीम बेटका येथील प्राचीन गुहेतील आदिमानवाची जीवनशैली व कलेचा उगम यांसारख्या वैज्ञानिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा स्थळांना विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या.

या अभ्यास दौऱ्याचे नियोजन अतिशय उत्तम पद्धतीने व विद्यार्थ्यांना एक वेगळाच अस्मरणीय शैक्षणिक अनुभव दिल्याबद्दल राजिप अलिबाग, माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, उपशिक्षणाधिकारी सुनीता चांदोरकर, शैक्षणिक सहलीचे नोडल अधिकारी सुभाष राठोड व शाळा समन्वयक अनिल पाटील तसेच पनवेल तालुका गटशिक्षणाधिकारी सिताराम मोहिते, चेअरमन व सर्व सदस्य स्थानिक स्कूल कमिटी कामोठे यांनी विशेष सहकार्य केल्याबद्दल या सर्वांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.के. कोंगेरे यांनी आभार मानले.

## सुएसो संचालक मंडळाच्या आशीर्वादाने मला अध्यक्षपद मिळाले -गीता पालरेचा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

सुधागड एज्युकेशन सोसायटी पालीचे अध्यक्ष आमचे वडील वसंतराव ओसवाल यांचे ४ सप्टेंबर ला निधन झाल्यावर सुएसोच्या अध्यक्ष पदासाठी व सचिव पदासाठी २३ मार्चला झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत सर्व संचालक मंडळाने मला सोसायटीच्या अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी तर राहेनच पण मला जे अध्यक्ष पद मिळाले आहे ते या सर्व संचालक मंडळाचे आर्शीवादच समजतो, असे प्रतिपादन कळंबोली येथील सुधागड विद्या संकुलात झालेल्या नवनिर्वाचित अध्यक्ष गीता पालरेचा व सचिव ग. रा. म्हात्रे यांच्या सत्कार समारंभात पालरेचा यांनी केले.



पुढे त्या म्हणाल्या की, सोसायटीच्या सर्व कर्मचारी मंडळीची कामे करतांना जो आनंद मला मिळतो तो लाखमोलाच्या पैश्यापेक्षा निश्चितच मोठा आहे. भविष्यात सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी स्वर्गीय दादासाहेब लिमये, स्वर्गीय वसंतराव ओसवाल यांची अपूर्ण राहिलेली स्वप्न मी माझ्या कालावधीत पूर्ण करण्याचा निश्चितच प्रयत्न करणार आहे.

या वेळी नवनिर्वाचित अध्यक्षा गीता पालरेचा व सचिव ग.रा. म्हात्रे यांचा संस्थेच्या सर्व शाळांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सुधागड विद्या संकुल कळंबोली चे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी गीताताईने आपल्या वडीलांच्या खांद्याला खांदा लावून गेली तीन वर्षे कार्यवाह पद समर्थपणे पेलवले आहे. त्या मुले भविष्यात निश्चितच त्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळत संस्थेला नावलौकिक मिळवून देतील यात तिळमात्र शंका नाही.

या वेळी शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय कळंबोली च्या प्राचार्या प्रिती महाजन, बांठिया हायस्कूल चे प्राचार्य भगवान माळी, कोलाड हायस्कूलचे मुख्याध्यापक सुखदेव तिरमळे आदिनी गीता पालरेचा व ग.रा. म्हात्रे यांच्या विषयी गौरवपद विचार व्यक्त करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व मुख्याध्यापक व लिपिक तसेच पनवेल तालुक्यातील शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन शरद देशमुख तर मान्यवरांचे आभार अनिल ठाकूर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधागड विद्या संकुल कळंबोलीच्या सर्व कर्मचारी यांनी मेहनत घेतली होती.

# आज ड्रीमलॅन्ड पंचावन्न वर्षांचे झाले असते...

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

आजच्या ऑनलाईन, ओटीटी, वीकेंड ट्रीप पिढीला जुन्या काळातील सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृह संस्कृतीबद्दल ओढ नसावी. आता तर मल्टीप्लेक्समधील फोर डी सुविधा आलिशान सीटवर बसल्या बसल्या एक वेगळाच अनुभव देते (त्यासाठी आजची युवा पिढी मल्टीप्लेक्सचे महागडे तिकीट ऑनलाईन काढण्यास तत्पर आहे) एक रसिक पिढी मात्र सिंगल स्क्रीन थिएटर्सबाहेर तिकीटासाठी रांग लावून आणि पडद्यावरील डायलॉगबाजीला उत्फूर्त टाळ्या नि शिट्ट्या देत वाढली.

असेच एक एकपडदा चित्रपटगृह होते, ड्रीमलॅन्ड. आज ते असते तर ते पंचावन्न वर्षांचे झाले असते. ८ एप्रिल १९७० रोजी प्रसाद प्रॉडक्सन्स निर्मित खिलौना या चित्रपटाने ड्रीमलॅन्डचे उद्घाटन झाले. चित्रपटात संजीवकुमार, जितेंद्र, मुमताज, शत्रुघ्न सिन्हा इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. ड्रीमलॅन्डचा पहिलाच चित्रपट ज्युबिली हिट.

हेच ड्रीमलॅन्ड थिएटर अलिकडेच जमीनदोस्त झाले. आणि ते पूर्णपणे पाडल्याचे फोटोदेखील सोशल मिडियात व्हायरल झाले. ड्रीमलॅन्ड पडद्याआड गेले. मात्र माझ्यासारख्या चित्रपट रसिकांच्या मनात ड्रीमलॅन्डच्या अनेक आठवणी कायम आहेत. तो काळ आपण एकादा चित्रपट नेमक्या कोणत्या चित्रपटगृहात नि किती पैशाचे वा रुपयाचे तिकीट काढून पाहतोय यावरही लक्ष देणारा असा होता.

दक्षिण मुंबईतील गिरगाव, प्रार्थना समाज, खेतवाडी, कुंभारवाडा, ग्रॅन्ट रोड, डॉ. भडकमकर मार्ग, ताडदेव परीसरात लहानाचे मोठे झालेल्या अनेक चित्रपट रसिकांसमोर एव्हाना गिरगाव कोर्टाजवळचे हे ड्रीमलॅन्ड थिएटर डोळ्यासमोर आले असेलच. मी गिरगावात लहानपणापासून याच ड्रीमलॅन्डमध्ये अनेक चित्रपट एन्जॉय केल्याने ही वास्तू पाडली जात असल्याचे वृत्त प्रचंड निराशाजनक आणि फ्लॅशबॅकमध्ये नेणारे असेच. थिएटर जमीनदोस्त झाल्यावर त्याचे प्रोजेक्शन, पडदा, हजार बाराशे सीटस यांचे काय होते असे प्रश्न उगाच अस्वस्थ करतात. साहजिकच आहे, चित्रपटगृह म्हणजे केवळ पडद्यावरचा चित्रपट नव्हे, तर त्यासह बरेच काही असते. चित्रपट इतिहासात त्यालादेखील महत्त्व असते. कारण हेच चित्रपटगृह रसिकांपर्यंत चित्रपट पोहचवत असतो.

आयुष्यात पहिल्यांदाच एखादे चित्रपटगृह पाडल्याचा अनुभव घेतला ते होते, आमच्या गिरगावातील मॅजेस्टीक. आमची खोताची वाडी, शेजारची आंबेवाडी आणि कुडाळेश्वर वाडी (जिला पेंडसे वाडी असे म्हटले जाते) याच्या अगदी समोरच मॅजेस्टिक सिनेमागृहाची वास्तू होती. आज त्याच्या कोणत्याही खाणाखुणा शिल्लक नाहीत. तेथे उत्तुंग इमारत उभी आहे, मात्र जगात आज कोणत्याही देशात असलेल्या मूळच्या गिरगावकरांना अशा वयाची साठी पासष्टी ओलांडल्याना मॅजेस्टीक थिएटर आजही आठवत असेल. मोहन बिल्डिंगच्या शेजारीच ते होते. पूर्वीचे आमचे गिरगाव मराठमोळे आणि मॅजेस्टीक थिएटरमध्ये सातत्याने मराठी चित्रपट प्रदर्शित होत असतानाच १९७२ साली ते बंद झाले आणि अख्खं गिरगाव हळहळले. माझे ते शालेय वय होते. आणि मग मुंबईतील एकेक चित्रपटगृह बंद होत असल्याच्या बातम्या वाचायला मिळू लागल्या. बेलॉर्ड पिअरचे रेक्स (ते इंदिरा डॉकसमोरच होते). दादर टी.टी.चे ब्रॉडवे १९७४ला बंद झाले... यात आणखी काही चित्रपटगृह बंदच्या बातम्या फोटोसह येत राहिल्या. कालांतराने मिनर्व्हाही बंद होऊन तेही जमीनदोस्त झाले तेव्हा फारच हळहळलो. कळत नकळतपणे आपल्या कारकिर्दीतील आणि व्यक्तिमत्त्वाचा एक भाग झालेले थिएटर डोळ्यासमोरुन जाणे हे क्लेशकारक असते. चित्रपटगृह ही फक्त एक चार भिंतीची इमारत नसते. एकीकडे चित्रपटसृष्टीच्या एकूणच चौफेर वाटचालीचा आणि समाजातील सर्वच स्तरांतील प्रेक्षकांच्या भावविश्वाचा स्वप्नांचा/आनंदाचा/आयुष्याचा/सवयीचा ते एक भाग झालेले असते. अमूकतमूक चित्रपटगृह जमिनदोस्त अशी दोन कॉलम फोटोची बातमी देण्यापुरते त्याचे अस्तित्व नसते. त्याची 'स्टोरी' बहुरंगी असते. प्रत्येक सिंगल स्क्रीन थिएटरचा आपला एक इतिहास, आपली एक ओळख,










आपली एक संस्कृती, आपले एक व्यक्तिमत्व असतेच असते. तुम्हीच बघा अथवा आठवा, कोणतीही दोन एकपडदा चित्रपटगृह एकसारखी नसतात. मिनर्व्हा वेगळे नि इंपिरियल वेगळे हीच तर खासियत होती.

ड्रीमलॅन्डही असेच वेगळे होते. मूळचे ते कृष्ण. त्याही पूर्वी विष्णू. त्याला दुभाष थिएटरही म्हणत. हे अगदीच जुन्या पठडीतील थिएटर होते. तेथे फार पूर्वीच प्रभात फिल्म कंपनीचा 'कुंकू' तसेच अमृत मंथन, संत सखू, धर्मात्मा, जशास तसे, श्यामची आई असे मराठी चित्रपट प्रदर्शित झाले. याचाच अर्थ त्या काळात कृष्ण टॉकीज मराठी रसिकांना आपलेसे वाटत असेल. ड्रीमलॅन्ड सुरू होताना सुरुवातीला कृष्ण ड्रीमलॅन्ड असे जाहिरातीत म्हटले जाई. प्रेक्षकांना नवीन चित्रपटगृहाची ओळख होईपर्यंत असे म्हणणे आवश्यक वाटले गेले हे विशेष उल्लेखनीय. चित्रपटगृह संस्कृतीमधील ही गोष्टही विशेष उल्लेखनीय. एका रसिक पिढीकडून पुढील पिढीत चित्रपट जातो तसेच चित्रपटगृहदेखील जात असे. एक पिढी पुढील पिढीला आपल्या विभागातील चित्रपटगृहांच्याही आठवणी सांगते आणि ते करताना फ्लॅशबॅकमध्ये रमते.

ड्रीमलॅन्डची वैशिष्ट्ये अनेक. बाहेरच्या बाजूलाच सिनेमाची शो अथवा लॉबी कार्ड्सच्या तीन मोठ्या शो केस. येता जाता कधीही थांबून रनिंग पिक्चरची शो कार्ड्स बघायची आणि अचानक एके दिवशी 'आगामी चित्रपटाची शो कार्ड्स' दिसत आणि या आगामी चित्रपटाचे मेन थिएटर ड्रीमलॅन्ड हे समजून येई. समांतर चित्रपट अर्थात नवप्रवाह/न्यू वेव्ह चित्रपटाचा पाया याच ड्रीमलॅन्डमध्ये घातला गेला. मृणाल सेन दिग्दर्शित 'भुवन शोम' (१९७०) याच ड्रीमलॅन्डला मॅटीनी शोला रिलीज झाला आणि समिक्षकांची दाद, चोखंदळ रसिकांचा वाढता प्रतिसाद असे करत करत या चित्रपटाने पंचवीस आठवड्यांचा मुक्काम केला आणि समांतर चित्रपट चळवळीचा आत्मविश्वास रूजला. तात्पर्य, हिंदीतील समांतर चित्रपट चळवळीत ड्रीमलॅन्ड चित्रपटगृहाचाही सहभाग आहे. चित्रपट गृह संस्कृतीतील ही विविधताच.

याच ड्रीमलॅन्डला रौप्यमहोत्सवी हिट ठरलेल्या चित्रपटांचे प्रगती पुस्तक सांगायचे तर, खिलौना, अंदाज, प्रेम नगर, गोलमाल, खट्टा मिठ्ठा, पती पत्नी और वो, सरगम, अर्जुन, बाजीगर वगैरे. लव्ह स्टोरी मेट्रोवरुन ड्रीमलॅन्डला शिफ्ट होत ज्युबिली झाला. 'तेजाब' हाऊसफुल्ल गर्दीत सुरु असतानाच अनिल कपूर व माधुरी दीक्षितवर आणखी एक गाणे चित्रीत करीन ते चित्रपटात समाविष्ट केले म्हणून पुन्हा ड्रीमलॅन्डची वारी केली. 'साजन'ची ज्युबिली साजरी करण्यास सुधाकर बोकाडे, लॉरेन्स डिसोझा, नदीम, श्रवण ड्रीमलॅन्डला आले आणि त्यांनी बुकिंग क्लर्क, डोअर्स किपर, वॉचमन वगैरेना ट्रॉफिज देत त्यांचा सत्कार केला. ड्रीमलॅन्डच्या माझ्या आठवणी अशा काही वेगळ्याच.

ड्रीमलॅन्डला मॅटीनी शोला अनेकदा नवीन चित्रपट प्रदर्शित होत. पिया का घर, दामाद, प्रतिबंध, तुम्हारी कसम, चला मुरारी हीरो, चटपटी बनने वगैरे

ड्रीमलॅन्डला शंभर दिवसाचे यश मिळवले ते मां, जरा सी जिंदगी, पोंगा पंडित, सौ दिन सांस के, एक ही भूल, मांग भरो सजना वगैरे चित्रपटांनी.

पन्नास वर्षांत ड्रीमलॅन्डला 'वारणेचा वाघ' हा एकमेव मराठी चित्रपट प्रदर्शित झाला. ड्रीमलॅन्डला मराठीचे वळण नव्हतेच. आणि त्यात मराठी चित्रपट प्रदर्शित व्हावा अशी अपेक्षाच नव्हती.

ड्रीमलॅन्डला अनेक चित्रपट फ्लॉपही झाले. त्या काळात मेन थिएटरचा फंडा महत्वाचा असल्याने हिट अथवा फ्लॉपचा खेळ मेळ खूपच महत्त्वाचा. काही फ्लॉप सांगायलाच हवेत, जोशीला, दो ठग, प्रेम बंधन, शानदार, चरित्र, धुऐ की लकीर, किमत, पैसे की गुडिया, लफंगे, कुदरत, अलग अलग, लव्ह लव्ह लव्ह, दीवाना मुझसा नहीं, ऐतबार, डकैत वगैरे विशेष म्हणजे, 'मेरा नाम जोकर'चे मेन नॉव्हेल्टी असतानाच त्यासह ड्रीमलॅन्डला एका अर्थात पहिल्या आठवड्यासाठी तो ड्रीमलॅन्डलाही होता. प्रसाद प्रॉडक्सन्सचा 'जय विजय' येथेच फ्लॉप झाला. ते अपयश पुसण्यासाठी काही रिशूटींग करीत 'जय विजय २' बनवून तोही याच ड्रीमलॅन्डला लागला तोच पडला. जणू घडवून आणलेला योगायोग.

ड्रीमलॅन्डची आणखी दोन वैशिष्ट्ये होती. प्रत्येक रविवारी सकाळी नऊ वाजता तेलगू, तमिळ, कन्नड अथवा मल्याळम अशा एकाद्या दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटाचा शो हाऊसफुल्ल गर्दीत चालत असे. माझे कुतूहल वाढल्याने मी शोध घेतला असता मला समजले, या पिक्चरच्या शोच्या निमित्ताने मुंबईतील अनेक साऊथ इंडियन एकमेकांना भेटत. सिनेमा पाहणे हे केवळ निमित्त असे. ही वेगळीच सामाजिक गोष्ट. साऊथ इंडियन चित्रपटाची मुंबईतील पाळेमुळे अशी खोलवर रूजलीत. आज ती पॅन इंडिया चित्रपट संस्कृतीत फारच फोफावलीत.

सत्तरच्या दशकात आम्ही चित्रपट व्यसनी प्रत्येक शुक्रवारी ड्रीमलॅन्डकडे पाठ करुन उभे राहून समोरच दक्षिण मुंबईतील अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्समधील बदलत्या (एखाद्या स्थिरावलेल्या) मॅटीनी शोचे तपशील मिळत. अहो, स्ट्रीट पोस्टरचे बोर्ड असत आणि या रविवारी कोणता पिक्चर मॅटीनीला एन्जॉय करायचा हे ठरवायचोच. एकदा का पिक्चर पाह्यचे ठरवले की ते एकच लक्ष्य असे. रस्त्यावरील सिनेमा पोस्टर संस्कृतीमधील हा अगदीच वेगळा फंडा. अशाच अनेक छोट्या छोट्या गोष्टींतून आपल्या देशात चित्रपट संस्कृती रुजलीय. अशा अनेक गोष्टी दुर्लक्षित राहिल्यात का?

याच ड्रीमलॅन्डच्या गल्लीत पुढे गेल्यावर पाववाला स्टीटवर बऱ्हाणपूर यांचे चित्रपटाच्या गाण्याचे छोटेसे पुस्तक विक्रीचे दुकान होते. फार पूर्वी मला आठवतय पाच पैसे किंमत होती त्याची. आणि अनेक थिएटरबाहेर असे पुस्तक उभ्या उभ्याच विकले जाई आणि डोक्यात अगदीच ताजा चित्रपट असल्याने आपोआपच खिशात हात जाई. चित्रपट गीत संगीत संस्कृतीत या साध्या कागदावर प्रसिद्ध व्हायच्या पुस्तिकांचाही वाटा.

चित्रपटगृह फक्त पिक्चरच दाखवत नसते तर त्यासह अनेक लहान मोठ्या गोष्टी घडत असतात. त्यातील अनेक गोष्टींतून आपलेही आयुष्य घडत असते, त्या गोष्टी आठवणीचा एक भाग ठरतात आणि एके दिवशी समजते ते चित्रपटगृह जमिनदोस्त झाले. आठवणींचा पट डोळ्यासमोर येतोच पण त्यात काही अश्रूही असतात. आपल्या देशात चित्रपट ही भावनिक ओढ असते आणि त्याची बांधिलकी चित्रपटगृहाच्या आठवणीत असते. अगणित पब्लिकला आपण पिक्चर नेमका कुठे पाह्यला (थिएटर की टीव्हीवर, अथवा गल्लीत की व्हिडिओवर) हेही आठवणीत असते. आणि हे त्यांचे जगावेगळे वैशिष्ट्य आहे.

आज ड्रीमलॅन्ड असते तर ते पंचावन्न वर्षांचे झाले असते. त्याजागी उभे राहत असलेल्या उत्तुंग इमारतीत कमी सीटसचे चित्रपटगृह असेल अशी अपेक्षा. मात्र आजही ड्रीमलॅन्ड जसेच्या तसे डोळ्यासमोर आहे. जुन्या काळातील अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्सचे तेच तर खास वैशिष्ट्य.

# राज्यकारभाराची कार्यक्षम संस्कृती निर्माण करणारे मोदी सरकार




६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली. आणिबाणीच्या कालखंडात विशिष्ट परिस्थितीत जन्मलेल्या जनता पक्षातून बाहेर पडत भारतीय जनता पक्षाची निर्मिती झाली. त्याआधी १९५१पासून भारतीय जनसंघ राष्ट्रीय राजकारणात होता. जनसंघाचेच नवे रूप भारतीय जनता पक्षाच्या रूपाने राष्ट्रीय राजकारणात कार्यरत झाले. १९८० ते २०२२ असा ४२ वर्षांचा कालखंड नजरेसमोर येत असताना भारतीय जनता पक्षाने राजकारणात या कालखंडात आपले स्वतःचे स्थान निर्माण करताना देशात नवी राजकीय संस्कृती जन्माला घालण्याचेही काम केले.

१९५१ ते १९७७ या काळात असलेल्या जनसंघाचा विस्तार राष्ट्रीय पातळीवर मर्यादितच होता. हिंदुत्ववादी शक्तींबद्दल महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर पसरवल्या गेलेल्या समज गैरसमजामुळे जनसंघाच्या वाढीला अनेक मर्यादा आल्या त्याही अडथळ्यांवर मात करत जनसंघ १९६७पर्यंत ३५ खासदार निवडून आणण्याएवढा दखलपात्र बनला होता. १९९०च्या दशकात भारतीय जनता पक्षाला काही राज्यात आणि देशाची सत्ता मिळाली. केंद्रात सरकार स्थापन करताना भारतीय जनता पक्षाला अनेक प्रादेशिक पक्षांची मदत घ्यावी लागली. या तडजोडीच्या राजकारणाचा अपरिहार्य परिणाम सत्ता राबविताना झाला. जनसंघ आणि भारतीय जनता पक्षाने प्रखर राष्ट्रवादाबरोबरच समाजातील सर्वात अविकसित माणसापर्यंत सरकारच्या योजनांचे लाभ पोहचवण्याच्या अंत्योदय विचारसरणीला सर्वोच्च स्थान दिले आहे. २०१४मध्ये आणि २०१९मध्ये केंद्रात स्वबळावर सत्ता स्थापन केल्यामुळे भारतीय जनता पक्षाला आपली अंत्योदयासारखी तत्वप्रणाली प्रत्यक्षात आणण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर राष्ट्रवादाच्या विचारधारेला विकासाची जोड देत देशाला समृद्ध, बलशाली राष्ट्र बनविण्याच्या दिशेने घोडदौड सुरू केली आहे.

प्रखर राष्ट्रवादाचा अर्थ केवळ शत्रू राष्ट्राला डोळ्यापुढे ठेवून देशाला शस्त्रसज्ज बनवणे असा नसून देशाला आर्थिक दृष्टीनेही सामर्थ्यशाली बनवणे असाही आहे. मोदी सरकारच्या १० वर्षांच्या राजवटीत शेजारी राष्ट्रांच्या कुरापतींना तितक्याच ताकदीने उत्तर दिले गेले. जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा सामर्थ्यशाली राष्ट्र अशी तयार करण्यात गेल्या १० वर्षात यश आले आहे. भारत कुणावरही आक्रमण करणार नाही मात्र भारतावर कुणी आक्रमण केले अथवा दहशतवादी कारवायांद्वारे अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला तर तो खपवून घेतला जाणार नाही, असा खणखणीत संदेश २०१६चा सर्जिकल स्ट्राईक, २०१९मधील बालाकोट एअर स्ट्राईक यातून संपूर्ण जगाला गेला आहे. २०१७मध्ये चीनने डोकलाम येथे केलेली घुसखोरी, २०२०मध्ये लडाखमध्ये केलेली आगळीक भारताने तितक्याच ताकदीने हाणून पाडली. १९६०च्या दशकात ड्रॅगनने केलेल्या चढाईचा इतिहास पाहता भारताने चीनला दिलेले हे उत्तर आंतरराष्ट्रीय राजकारणाला अनपेक्षित होते. नवी राजकीय संस्कृती यालाच म्हणतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात बड्या शक्तींच्या 'अरे'ला 'कारे' असे म्हणण्याचे सामर्थ्य निर्माण करणे म्हणजेच नवी संस्कृती जन्माला घालणे. आत्मनिर्भर योजनेसारख्या योजनेतून आंतरराष्ट्रीय मापदंडावर टिकणारी उत्पादने निर्यात करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेला गती मिळाली आहे. केंद्र सरकारने ४०० अब्ज डॉलरच्या निर्यातीचे लक्ष्य निश्चित केले होते. हे लक्ष्य भारताने निर्धारीत वेळेच्या नऊ दिवस आधीच पूर्ण केले आहे. पंतप्रधान मोदींनी दिलेल्या माहितीनुसार भारत दररोज जवळपास एक अब्ज डॉलर्स किमतीच्या वस्तूंची निर्यात करतो. जवळपास ४६ दशलक्ष डॉलर किमतीचा माल दररोज वेगवेगळ्या देशात निर्यात केला जात आहे.

भारतासारख्या कल्याणकारी शासन पद्धत स्वीकारलेल्या देशात सरकारी योजनांचे लाभ गरजूंपर्यंत पोहचविण्याची २०१४पर्यंतची रूढ पद्धत मोदी सरकारने निर्धाराने बदलली. या रूढ पद्धतीत सरकारी यंत्रणेतील आणि राजकीय व्यवस्थेतील मध्यस्थांचे जाळे निर्माण झाले होते. जनधन योजनेतून अल्प उत्पन्न, दारिद्र्य रेषेखालील जनतेची बँक खाती उघडून उज्वला, पंतप्रधान आवास योजनेसारख्या अनेक योजनांचे फायदे थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचवले जात आहेत. गोरगरीबांचे मालकीच्या घराचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आतापर्यंत ३.१० कोटी पक्की घरे देशभर बांधण्यात आली आहेत. या योजनेसाठी तीन लाख कोटींहून अधिक अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे महाराष्ट्रात या योजनेंतर्गत सहा लाख ६८ हजार ३६३ बांधून देण्यात आली आहेत. देशातील प्रत्येक गोरगरीब माणसाच्या मालकीचे घर असावे या हेतूने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान आवास योजना सुरू केली. या योजनेची अंमलबजावणी शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात होत आहे. ग्रामीण भागात २.५२ कोटी घरे बांधून देण्यात आली आहेत, तर शहरी आवास योजनेंतर्गत ५८ लाख पक्की घरे बांधण्यात आली आहेत. ग्रामीण आवास योजनेंतर्गत १.९५ लाख कोटी इतके अर्थसहाय्य गरजूंना देण्यात आले आहे. शहरी आवास योजनेअंतर्गत १.१८ लाख कोटी इतके अर्थसहाय्य लाभार्थींना देण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनाही याच मार्गाने साह्य केले जात आहे. हे करीत असताना लाभार्थी जनतेशी नित्य संवाद साधून तसेच विविध माध्यमांतून जनतेचे मत जाणून घेतले जाते आहे. पंतप्रधानांकडे तक्रार पाठविल्यास त्याची तातडीने दखल घेणारी यंत्रणा निर्माण केली गेली आहे. वरवर अगदी छोटी वाटणारी, पण अनेकांनी अनुभवलेली गोष्ट म्हणजे रेल्वे प्रवाशांनी प्रवासातील अडचणींबद्दल केलेल्या ट्वीट दखल घेऊन त्याचे निराकरण केले जाते, असा अनुभव अनेकांना आला आहे. द्रुतगती महामार्ग, राष्ट्रीय महामार्गांची कामे धडाक्याने होत आहेत. यातून राज्यकारभाराच्या कार्यक्षम संस्कृतीचा अनुभव जनता घेत आहे.

**-केशव उपाध्ये,**
मुख्य प्रदेश प्रवक्ते, भाजप

# मराठी भावगीतकार हणमंत नरहर जोशी



हणमंत नरहर जोशी अर्थात 'काव्यतीर्थ' कवी सुधांशु हे नामवंत कवी होते. त्यांचा जन्म ६ एप्रिल १९१७ रोजी सांगली जिल्ह्यातील औदुंबर गावी झाला. त्यांनी अनेक मराठी भावगीते लिहिली आहेत. मराठी कवी कुंजविहारी यांनी ह.न. जोशी यांना सुधांशु हे नाव दिले आणि पुढे त्याच नावाने ते ओळखले जाऊ लागले.

१९३७पासून सुधांशु यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. त्यांच्या कविता किर्लोस्कर, स्त्री, मनोहर आदी मासिकांतून प्रसिद्ध होत होत्या. या कवितांचे पुढे पुस्तकरूपाने संग्रह झाले. सुधांशूंना एकदा रा.अ. कुंभोजकर यांनी 'तुम्ही कवी कसे झालात?' असे विचारले. त्यावर ते म्हणाले, 'मी दोन मातांच्यामुळे कवी झालो.

एक माझी जन्मदात्री माऊली आणि दुसरी कृष्णामाई. एकीने माझ्या अंत:करणात कवितेची बीजे रूजवली आणि दुसरीने आपल्या निर्मलतेने आणि समृद्धीने मला काव्यदृष्टी दिली. 'सुधांशूंच्या गीतदत्तात्रयाचे कार्यक्रम श्रीक्षेत्र औदुंबर येथे पहिल्यांदा, नंतर मिरजेच्या अण्णाबुवा मठात आणि नंतर इतर अनेक ठिकाणी झाले.

कवी सुधांशु यांनी आयुष्यभर खादीचे कपडे घातले. त्यांच्या अंगावर सतत एक शाल असे. सुधांशूंनी भारताच्या १९४२ सालच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. आपल्या स्वातंत्र्यगीतांतून आणि पोवाड्यांतून त्यांनी स्वातंत्रसैनिकांना स्फूर्ती दिली. त्यांच्या घरी काही भूमिगत स्वातंत्र्यसैनिक एकदोन दिवसांसाठी गुप्तपणे मुक्कामासाठी राहून जात. गावकर्यांच्या कवी सुधांशूवर असलेल्या अतूट प्रेमामुळे ही बातमी पोलिसांपर्यंत कधीच पोहचली नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी स्वत:ला ग्रामसुधारणेला वाहून घेतले.

१९६०मध्ये ते अंकलखोप या गावचे सरपंच म्हणून बिनविरोध निवडून आले आणि १९६५पर्यंत त्या पदावर राहिले. त्याच सुमाराला गावाला स्वच्छतेचा आणि व्यसनमुक्तीचा पुरस्कारही मिळाला. कवी सुधांशूंना शंकराचार्यांकडून काव्यतीर्थ ही पदवी मिळाली. भारत सरकारकडून १९७४मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्कार, मराठी साहित्य परिषदेकडून कवी यशवंत पुरस्कार मिळाला. अशा या महान कवीचे १८ सप्टेंबर २००६ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

# बंगाली अभिनेत्री सुचित्रा सेन



बंगाली अभिनेत्री सुचित्रा सेन यांचा ६ एप्रिल १९३१ हा जन्मदिन. त्यांचे विवाहाआधीचे नाव रमा दासगुप्ता असे होते. किमान तीन दशके तरी आपल्या सौंदर्याबरोबरच, सशक्त अभिनयाने सुचित्रा सेन या बंगाली चित्रपटाच्या सुवर्णयुगातील एक महत्त्वाच्या साक्षीदार ठरल्या. अग्निपरीक्षा, देवदास, सात पाके बंधा हे त्यांचे बंगाली चित्रपट विशेष लक्षात राहिले.

हरणासारखे नेत्रसौंदर्य (मृगनयनी) लाभलेल्या सुचित्रा सेन यांनी सत्तरच्या दशकात चित्रपटसृष्टी सोडली. नेहमी सार्वजनिक जीवनात मिसळणे टाळणाऱ्या सुचित्रा सेन या बंगालच्या 'ग्रेटा गाब्रो' म्हणून प्रसिद्ध होत्या. कन्नन देवी यांच्यानंतर बंगालमधील एकाही अभिनेत्रीला सुचित्रा सेन यांच्याइतके चाहते मिळाले नाहीत. त्यांची लोकप्रियता इतकी होती, की दुर्गापूजेच्या वेळी दुर्गा, लक्ष्मी व सरस्वती यांच्या प्रतिमा सुचित्रा सेन यांच्या चेहऱ्यावर बेतल्या जात असत. 'शेष कोठाई' या चित्रपटापासून त्यांनी १९५२मध्ये सुरुवात केली व नंतर बिमल रॉय यांच्या १९५५मधील 'देवदास' या चित्रपटात त्यांना दिलीपकुमारच्या देवदासबरोबर साकारलेल्या पारोच्या भूमिकेसाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. बंगाली अभिनेते उत्तम कुमार यांच्याबरोबर त्यांची चांगली जोडी पडद्यावर जुळली. त्यांचे हारनो सूर (१९५७), अग्निपरीक्षा (१९५४), सप्तपदी (१९६१), ग्रिहदाह (१९६७), इंद्राणी (१९५८), सागरिका (१९५६), बिपाशा (१९६२), कमल लता (१९६९), अलो आमार अलो (१९७२), हर मन हर (१९७२) व प्रियो बंधाबी (१९७५) हे चित्रपट संस्मरणीय ठरले. त्यांनी ५२ बंगाली, तर सात हिंदी चित्रपट केले. भारतभूषणबरोबरचा चंपाकली, देव आनंदबरोबर सरहद, बंबई का बाबू यासह ममता हा एक चित्रपटही त्यांनी केला होता. १९७४मध्ये त्यांनी 'देवदास'नंतर गुलजार यांच्या 'आँधी' चित्रपटाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संजीव कुमार यांच्यासमवेत त्यांनी जी भूमिका केली होती, त्यात त्यांची भूमिका ही इंदिरा गांधी यांच्या जीवनाशी मिळतीजुळती होती त्यामुळे तेव्हा वाद निर्माण झाला होता. १९७८मध्ये त्यांनी सौमित्र चटर्जी यांच्याबरोबर 'प्रणोय पाश' हा चित्रपट केला. तो पडला. त्यानंतर सुचित्रा सेन कधीच कुणाला दिसल्या नाहीत.

कारकिर्दीनंतर सुचित्रा सेन एकाकी जगू लागल्या. आपल्या घरातच त्यांनी स्वतःला बंदिस्त करून घेतले होते. २००५मध्ये दादासाहेब फाळके पुरस्कार स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता. त्यांना भारत सरकारकडून पद्मश्री आणि बंगाल सरकारकडून बंगबिभूषण हे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. सुचित्रा सेन यांचे १७ जानेवारी २०१४ रोजी निधन झाले.

–संजीव वेलणकर

# पाली शहरातील अतिक्रमणे हटवावीत



## नागरिकांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहरातील अतिक्रमणामुळे येथील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीला तर अडथळा येतोच, मात्र पादचाऱ्यांचीदेखील गैरसोय होते. त्यामुळे पाली बाजारपेठेत हटाळेश्वर चौक ते बस स्थानक व इतर ठिकाणी रस्त्यावर आलेली अतिक्रमणे हटविण्याबाबत शेकडो सह्यांचे निवेदन पाली नगरपंचायत मुख्याधिकारी विद्या येरुणकर यांना देण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही सर्व पाली नगरपंचायत हद्दीतील रहिवासी आहोत. नगरपंचायत स्थापन झाल्यापासून काही बदल नक्कीच छान झाले आहेत आणि त्याचे कौतुकसुद्धा आम्ही नागरिकांनी केले आहे, परंतु काही बाबतीत प्रशासनाचे महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १७७ ते १८२ नुसार कार्यवाही करण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.

पाली शहरात मोठ्या प्रमाणात भाविक बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी व तालुक्यातील नागरिक विविध कामांसाठी आणि विद्यार्थी शिक्षणासाठी दाखल होतात, मात्र पाली बस स्थानक जे दुरावस्थेत आहे, त्या ठिकाणाहून हटाळेश्वर चौक मार्गावर चालताना, गाड्या चालवताना त्या मार्गावरील व्यापारी अतिक्रमणामुळे नागरिकांना व भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. हा मार्ग नागरिक, लहान मुले, स्त्रिया, प्रौढ व्यक्ती यांसाठी असुरक्षित बनला आहे. त्यामुळे, राज्यघटनेने अनुच्छेद २१ प्रमाणे दिलेल्या जिवीत आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य संरक्षण अधिकाराचे तसेच अनुच्छेद १९(१)(ड) चे उल्लंघन होत आहे.

येथील व्यापाऱ्यांनी, आधी ओट्या तयार केल्या नंतर त्यांवर बांधकाम करून गाळे वाढविले, त्यापुढे पायऱ्या वाढविल्या, पुन्हा गाळे वाढविले. ज्या रस्त्यावरून समोरासमोरून दोन बस पास व्हायच्या तिथे आत्ता एक बस पास होताना अडचणी निर्माण झाल्या आहेत. शिवाय, बस स्थानकापलीकडील रहिवासी प्रवास करताना त्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

त्यामुळे गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन पालीकरांना सन्मानाने आणि सुरक्षितपणे सदर रस्त्यावर चालून देण्याचा मूलभूत हक्क आणि अधिकार पुनर्प्रस्थापित करावा असे निवेदनात नमूद केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या येरुणकर यांना निवेदन देताना प्रदीप (दादू) गोळे, ॲड. नरेश शिंदे, अमित निंबाळकर, कृष्णा पालांडे व कपिल पाटील आदी नागरिक उपस्थित होते.

याबाबत पाली नगरपंचायतच्या मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या येरूणकर यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, यासंदर्भात आमच्या इंजिनिअर सोबत बोलून घेऊन त्या ठिकाणची पाहणी करून मग निर्णय घेतला जाईल.

**पाली शहरात जी रस्त्यावर आलेली अतिक्रमण आहेत. त्यातील काही महत्वाची अतिक्रमण हटवण्यात आलेली आहे. याबरोबरच हटाळेश्वर चौक ते पाली बस स्थानकापर्यंतच्या रस्त्यावर अतिक्रमण केलेल्यांना याआधीदेखील नोटीस काढल्या आहेत आणि आता देखील त्यांना व शहरातील इतर ठिकाणी असलेल्या अतिक्रमण करणाऱ्यांना नोटीस काढण्यात येतील. त्यांची कागदपत्रे तपासून पंचनामा केला जाईल आणि पुढील कारवाई करण्यात येईल.**

**–प्रणाली शेळके, नगराध्यक्ष, पाली नगरपंचायत**

# झाडांच्या धोकादायक फांद्या छाटण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

एप्रिल व मे महिन्यात मुरूड समुद्र किनारी पर्यटकांची मोठी गर्दी असते. पर्यटनचा हंगाम सुरू होत असताना पर्यटकांची काळजी घेणे सुधा खूप महत्वाचे आहे. मुरूड समुद्रकिनारी खूप मोठी नारळाची उंचच उंच झाडे आहेत.

या नारळ झाडाखाली असंख्य पर्यटकांची ये-जा असते.पर्यटकांच्या अंगावर झाप किंवा नारळ पडू नये यासाठी बागायत मालकांनी अथवा मुरूड नगर परिषदेकडून या झाडांची साफ सफाई करण्यात यावी, अशी मागणी समाज सेवक व पद्मदुर्ग व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी लेखी निवेदनाद्वारे मुरुड नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

याबाबत गायकर यांनी सांगितले की, नुकतीच एक घटना समुद्रकिनारी घडली होती. राजपुरी कोळीवाडा परिसरातील एका व्यक्तीच्या



डोक्यावर नारळ पडून तो जागीच मृत्युमुखी पडला होता. अशी घटना पर्यटक यांच्या बाबतीत घडू नये व पर्यटक यांना शंभर टक्के सुरक्षेची हमी मिळण्यासाठी मुरूड नगरपरिषदेने समुद्र किनारी असणाऱ्या बागायत मालकांना सांगून वेळ वेळी नारळ झाडाची साफ सफाई करण्यास सांगणे खूप आवश्यक आहे, असे लेखी निवेदन द्वारे त्यांनी मुरूड नगर परिषदेस कळवले आहे.

मुरुड-जंजिरामध्ये पर्यटकांचा ओघ वाढला आहे. प्रवासातील संभाव्य धोका ओळखून समुद्रकिनारी रस्त्यालगत, आलेल्या रस्त्यावर नारळ झाडांवरील नारळ व झाप काढण्यात यावेत, अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळातर्फे करण्यात आली आहे. मंडळाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी सहकाऱ्यांसोबत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनही दिले आहे.

मुरूड समुद्रकिनाऱ्यावर सध्या पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. समुद्रकिनाऱ्यावर पायी फिरणाऱ्यांची संख्या जास्त आहे. किनाऱ्यावर समुद्राच्या बाजूस रस्त्यावर अनेक माडाची झाडे झुकलेली आहेत. पद्मदुर्ग व्यावसायिक संघटनेकडून अपघात रोखण्याकडे लक्ष वेधण्यात आले. या वेळी गायकर यांच्या समवेत मंडळाचे शैलेश वारेकर, देवेंद्र सतवीडकर, दामोदर खारेगावकर या वेळी उपस्थित होते.

# फसवणूक झालेल्यांनी अटक आरोपी बंदरकरविषयी तक्रार करण्याचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

फसवणूक झालेल्यांनी अटक आरोपी रियाज अहमद कासीम बंदरकरविषयी तक्रार दाखल करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

सन २०१९मध्ये गुन्हयातील अटक आरोपी रियाज अहमद कासीम बंदरकर याने मुरूड तालुक्यात तिजाराहा इंटरप्रायझेस नावाने कंपनी सुरू करून सदर कंपनीमध्ये मुरूड तालुक्यातील नागरिकांना पैसे गुंतवणुक करण्यास सांगुन त्या मोबदल्यात चांगला नफा मिळवुन देता, असे आश्वासन देवुन नागरिकांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडुन वेगवेगळ्या तारखेस वेगवेगळी रक्कम स्वीकारून गुंतवणुक केलेल्या रक्कमेवर आरोपींने काही दिवस फिर्यादी व साक्षीदार यांना नफा दिला, परंतु त्यानंतर नागरिकांना नफा देण्यास बंद करून, गुंतवणुक केलेली रक्कम ही परत न करता ती देण्यास टाळाटाळ करून दुबई या बाहेर देशात पळवुन जावुन गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांची एक कोटी ७८ लाख रूपयांची फसवणुक केली असलेबाबत दि. ०३/०८/२०२४ रोजी मुरूड पोलीस ठाणे, गु.र.नं.११०/२०२४ भा.द.वि. कलम ४२०, ४०६ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील ) हितसंरक्षण अधिनियम (एम.पी.आय.डी) १९९९ चे कलम ३,४ प्रमाणे दाखल केला आहे.

मा. न्यायालयाने नमूद आरोपी नामे रियाज अहमद कासीम बंदरकर यास दिनांक ०७/०४/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक रूपेश नरे हे गुन्ह्यातील पुढील तपास करीत आहेत.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड अलिबाग यांच्यामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, यातील अटक आरोपी रियाज अहमद कासीम बंदरकर यान मुरूड सह इतर तालुक्यात कोणाची फसवणूक केली असल्यास फसवणूक झालेल्या लोकांनी उपलब्ध कागदपत्रांसह पोलीस अधीक्षक कार्यालय, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड अलिबाग येथे संपर्क साधन्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# अलिबाग येथे हातमाग, यंत्रमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री केंद्राचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लग्नसराई निमित्त सोलापूरच्या भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग कापड भव्य प्रदर्शन व विक्री केंद्राचे उद्घाटन करण्यात आले आहे. डोंगरे हॉल सार्वजनिक वाचनालय पोस्ट ऑफिस समोर अलिबाग. प्रदर्शन येथे सुरू आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना अध्यक्ष साईनाथ पवार, रायगड जिल्हा परिषद माजी अधिकारी सुरेश म्हात्रे, सार्वजनिक वाचनालय ग्रंथपाल भालचंद्र वर्तक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन १ ते १५ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. हातमागावरील विणकाम करून तयार केलेले कापड अत्यंत चांगला दर्जाचा असते त्यामुळे हातमाग कापड प्रदर्शनाचा अलिबाग वासियांनी लाभ घ्यावे, असे आवाहन प्रदर्शनाचे प्रमुख पुरुषोत्तम पोतन यांनी केले.

भारतीय संस्कृतीच्या प्रसार साठी व हातमागाच्या विणकाम करून वापरण्यायोग्य कापड तयार केले जाते. या कापडाच्या वापरामुळे कोणत्याही प्रकारचे त्वचारोग होत नाही हे कापड तयार करण्यासाठी अधिक मनुष्यबळ लागत असल्याने सध्या हातमाग कापडाची निर्मिती कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे या व्यावसायामध्ये आमची नवी पीढी येत नसल्याची खंत होत आहे पांडुरंग पोतन यांनी व्यक्त केले आहे.

या वेळी गोवर्धन कोडम, बाळू कोडम, श्रीकांत श्रीराम, दीपक गुंडू, लक्ष्मण उडता, अविनाश जालादी यांनी उपस्थित होते. प्रदर्शनात कॉटन साडी, इरकल साडी, मधुराई साडी, खादी साडी, धारवाड साडी, मधूराई सिल्क साडी, सेमी पैठणी, खादी सिल्क साडी, प्रिंटेड ड्रेस, वर्क ड्रेस मटेरियल, पटोला ड्रेस, कॉटन परकर, टॉप पिस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन, सतरंजी, पंचा, टॉवेल, वुलनचादर, दिवाणसेट, प्रिंटेड बेडशीट, पिलो कव्हर लुंगी व शर्ट, कुर्ता, बंडी, गाहून, विविध प्रकारच्या विक्रीसाठी टेवण्यात आले आहे.

सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २० टक्के सुट ठेवण्यात आले आहे, असे आयोजकांनी सांगितले आहे.

# श्री रामाच्या मूर्तीचे आज लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील दहिवली भागातील उल्हास नदी किनारी असलेल्या गणेश घाटावर उभारण्यात आलेल्या श्रीरामाच्या मूर्तीचे लोकार्पण श्री रामनवमीच्या मुहूर्तावर करण्यात येणार आहे. त्यामुळे कर्जतकरांना अजून एक नयनरम्य ठिकाण उपलब्ध होणार आहे.

कर्जत - कोंदिवडे रस्त्या शेजारी उल्हास नदीच्या तीरावर श्रीरामाची ३० फूट उंचीची मूर्ती साकारण्यात आली आहे. आता जेथे मूर्ती उभारण्यात आली आहे. त्या परिसरात अस्वच्छता असायची आता हे आवार अतिशय स्वच्छ करण्यात आले असून संरक्षक भिंतसुद्धा तयार करण्यात आली आहे. या परिसरात भित्तीचित्रे लावण्यात आली आहेत. तसेच विद्युत रोषणाईने हा परिसर उजळून निघणार आहे. येथे येणाऱ्यांसाठी आसन व्यवस्थाही करण्यात आली आहे.

उल्हास नदीच्या एका तीरावर महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठू माऊलीची बावन्न फूट उंचीची भव्य मूर्ती आणि दुसऱ्या तीरावर प्रभू श्रीरामाची मूर्ती उभारण्यात आल्याने कर्जतच्या वैभवात भर पडणार आहे. तालुक्यातील पर्यटन वाढीसाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्या संकल्पनेतून हे दोन्ही उपक्रम साकारले आहेत.



आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते श्रीरामाच्या मूर्तीचे लोकार्पण उद्या श्री राम नवमीच्या मुहूर्तावर सायंकाळी सहा वाजता होणार असून माजी आमदार सुरेश लाड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या निमित्ताने श्री रामांच्या जीवनावर आधारित संगीतमय रामकथा 'मन हो राम रंगी रंगले' या भावगीतांच्या संगीत मैफिलीचे आयोजन केले आहे.

टीव्ही स्टार गायक गौरव महाराष्ट्राचा फेम नचिकेत देसाई, सारेगमप फेम जयश्री करंबेळकर, श्रीरंग भावे यांच्या सह निवेदिका अनुया गरवारे असून या संगीत मैफिलीचे निर्माता विवेक भागवत आहेत.

# मध्य रेल्वेची चित्रपटांच्या चित्रीकरणातून ४०.१३ लाख कमाई

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने २०२४-२५ या आर्थिक वर्षात चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी विविध परिसर आणि रेल्वे कोच देऊन ४०.१३ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवले आहे. मध्य रेल्वेच्या विविध ठिकाणी विविध चित्रपट निर्माते आणि धर्मा प्रॉडक्शन्स सारख्या आघाडीच्या निर्मिती संस्थांनी ३ नेटफ्लिक्स चित्रपट, २ वेब सिरीज, १ प्रादेशिक चित्रपट आणि १ जाहिरात चित्रपट असे सुमारे ७ चित्रीकरण केले.

मध्य रेल्वेने कथा पिक्चर्स प्रोडक्शनच्या गांधारी चित्रपटाच्या चित्रीकरणातून सर्वाधिक १७.८५ लाख रुपये मिळविले, त्यानंतर धर्मा प्रोडक्शनच्या आप जैसा कोई चित्रपटाच्या चित्रीकरणातून ८.१२ लाख रुपये मिळविले.

हे दोन्ही चित्रपट आपटा स्टेशनवर चित्रित झाले आहेत, जे पूर्वी दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, मुन्ना मायकल आणि इतर सारख्या प्रतिष्ठित चित्रपटांसाठीचे ठिकाण होते.

नैसर्गिक सौंदर्यामुळे आपटा स्टेशन, मध्य रेल्वेवरील सर्वात आवडत्या ठिकाणांपैकी एक आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात आपटा येथे एकूण ३




चित्रीकरणे झाली आहेत, ज्यातून एकूण २७.५७ लाख रुपये उत्पन्न मिळाले आहे, जे २०२४-२५मध्ये चित्रपट चित्रीकरणातून झालेल्या एकूण उत्पन्नाच्या सुमारे ६८ टक्के आहे. इतर ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, कॉटन ग्रीन स्टेशन आणि माटुंगा यांचा समावेश आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ दरम्यान चित्रित झालेले इतर चित्रपट व जाहिरातीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे नेटफ्लिक्स चित्रपट खाकी आणि टी-२० विश्वचषक जाहिरात, कॉटन ग्रीन स्टेशनवर तेलगू चित्रपट कुबेर, आपटा येथे चिल्ड्रन ऑफ फ्रीडम वेब सिरीज, माटुंगा येथे दल दल वेब सिरीज चित्रीकरण करण्यात आले.

मध्य रेल्वेवर स्लमडॉग मिलेनियर, कमिने, रब ने बना दी जोडी, रा-वन, रावन, प्रेम रतन धन पायो, दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे, कुछ कुछ होता है, दबंग, दरबार, रंग दे बसंती, पेहंकी, बांहग, यांसारखे अनेक बॉक्स ऑफिस हिट चित्रपट शूट झाले आहेत. चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी सर्वात पसंतीची ठिकाणे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि आपटा, पनवेल, लोणावळा, खंडाळा, वाठार, सातारासारखी इतर लोकप्रिय स्थानके आणि तुर्भे आणि वाडी बंदरसारखी रेल्वे यार्ड आहेत.

मध्य रेल्वेच्या जनसंपर्क विभागाकडून चित्रपटाच्या चित्रीकरणाची परवानगी दिली जाते आणि चित्रपटाच्या चित्रीकरणाची परवानगी जलद मिळावी यासाठी एक 'सिंगल विंडो सिस्टम' सुरू करण्यात आली आहे. प्रक्रियेच्या या सरलीकरणामुळे चित्रपट कंपन्यांना अर्जासोबत पटकथा आणि आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर परवानगी मिळण्यास मदत होते.


# ऑनलाईनच्या जमान्यातही फिरते विक्रेते तेजीत

## शहरासह खेडोपाड्यात खरेदीस प्राधान्य

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सोशल मिडिया, युटयुबच्या माध्यमातून अगदी घरातूनच ऑनलाईन खरेदी विक्रीस प्राधान्य दिले जात असताना, शहरासह खेडेपाडयात घरपोच विक्री व खरेदी करणारे फिरते व्यापारीसुध्दा तेजीतच आहेत.

शहरासह खेडेपाडयात दिवसभरात हे फिरते विक्रेते नित्याने विविध डोक्यावर घेवुन पायी चालत, सायकल, मोटरसायकल, किंवा चार चाकी वाहनाने घरोघरी फिरत असतात, सध्यस्थितीत ऑनलाईन खरेदी व विक्रीला प्राधान्य दिले जात असताना, घराघरासमोर येणारे



फिरते विक्रेते विविध व्यवसायाच्या माध्यमातून अद्यपही आर्थिक उलाढाल करतात. या फिरते विक्रेत्याकडे जीवनाश्यक व कौटूंबिक आवश्यक व गरजेच्या जीन्नसासह खाण्याचे पदार्थ सुध्दा उपलब्ध असतात.

पिढयानंपिढया फिरते विक्रीच्या व्यवसाय करणारे अनेक विक्रेते शहरासह खेडेपाडयात नेहमीच आढळतात. विशेषतः फिरते विक्रेत्ये नेहमी रोखीच्या व्यवहारात आर्थिक उलाढाल करताना दिसून येतात, यामध्ये प्लॅष्टिक बनावटीच्या वस्तू, घरगुती जीवनाश्यक छोटया मोठया वस्तू, कांदे बटाटे विक्री, बिस्किटे, बेकरी मधील वस्तू, कपडे,चादरी विक्रीवाले, नित्याने घरोघरी फिरतात. या व्यवसायातून फिरते विक्रेते कुटूंबाचा उदरनिर्वाहासाठी आर्थिक उत्पन्न मिळवित असतात. मोठ्या शहरातून विविध वस्तूची खरेदी करून गावोगावी, घरोघरी जाऊन विक्री व्यवसाय साधला जातो, अदयापी खेडेपाडयात या फिरते विक्रेत्यांचा फारच बोलबाला असून या फिरते विक्रेत्याकडून खरेदी करण्याचा कळ ग्रामीण भागात नित्याने आढळतो. पावसाळा संपला की, मे अखेरीपर्यंत हे फिरते विक्रेते व्यवसाय साधीत असतात.

अनेक विक्रेते नवीन घ्या, व जुने दया या तत्वावर सुध्दा व्यवसाय साधीत असतात, विविध प्लॅष्टिक वस्तूच्या बदल्यात घरातील जुने कपडे अशी आदलाबदलाचा व्यवहार सुध्दा होतो. विशेषतः हा फिरते विक्रीचाा व्यवसाय साधणारे अनेक व्यापारी हे परप्रांतातूनच आलेले दिसून येतात. एखाद दुसरा स्थानिक विक्रेता हा व्यवसाय करताना आढळतो. अनेक वर्ष फिरते विक्रीच्या व्यवसाय करताना, प्रत्येक विक्रेते खेडोपाडी घराघरात व्यक्तीशः ओळख निर्माण करतात. एक आगळीवेगळी नाती या फिरते विक्रेत्यांनी गावागावातून निर्माण केले आहे.

ऑनलाईन खरेदी विक्रीच्या जमान्यात सुध्दा हे खेडेपाडयातून, गावागावातून घराघरात जाऊन विक्री व्यवसाय साधणारे फिरते विक्रेते अद्यापही अस्तित्व राखून आहेत.

**CHANGE OF NAME**

I, Ramacharya Gudi, residing at Plot No. 26, Road No. 16, near Shantiniketan School, Sector 1, New Panvel, Raigarh - 410206, hereby declare that I have corrected my name. It was previously stated as Ramacharya Gudi, s/o Vasantacharya Gudi, (As per 10 th Marks card). However, as per the Affidavit dated April 4, 2025, my name has now been changed to Ramacharya Gudi, s/o Vasant Gudi (Aadhar Card/Pan Card) for all future purposes.

sd/-
Ramacharya Gudi
New Name

# बेशिस्त वाहतुकीवर कारवाईचा बडगा

## नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात तीन हजार वाहनांवर दंड

**नवी मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात वाहतूक शाखेने विशेष मोहीम राबवली. यात 'नो पार्किंग' असतानाही त्या ठिकाणी वाहने उभ्या करणाऱ्या आणि वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या तीन हजार २९७ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

नवी मुंबई हे १०० टक्के साक्षरता असलेले शहर असले तरी या साक्षर शहरात बेशिस्त पार्किंग मोठ्या प्रमाणात केले जाते. त्यात गर्दीच्या ठिकाणी अशा पार्किंगमुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत असते. यात सीबीडी सेक्टर १५, वाशी सेक्टर ९/१० , १५/१६, सतरा प्लाझा परिसर, एपीएमसी परिसर, पाम बीच नेरूळ सिग्नल जवळ असणारे शॉपिंग कॉम्प्लेक्स, ऐरोलीतील दिवा नाका, सेक्टर ३ ते ५, कोपरखैरणेतील रा. फ नाईक चौक ते एमएसइबी सेक्टर २ व १९ बस थांबा परिसर यांचा समावेश आहे. याशिवाय जवळपास सर्व रेल्वे स्थानकांच्या परिसरात बेशिस्त पार्किंग मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यात सीबीडी आणि वाशी सेक्टर ९/१० आणि १५/१६ या मार्केट परिसरापासून पाच मिनिटांच्या अंतरावर सेक्टर १६ येथील नाल्यावर पार्किंग सोय असूनही वाहनचालक मार्केटमध्येच वाहने बेशिस्तीने उभी करतात.



अनेक ठिकाणी तिहेरी पार्किंग केली जाते. अशा वेळी वाहनचालक वाहनात बसून मोबाइलवर बोलत असतात. मात्र आपल्या वाहनामुळे वाहतूक कोंडी होत आहे याचे काहीही देणेघेणे नाही असा त्यांचा आविर्भाव दिसतो. विशेष म्हणजे वाहतूक पोलिसाने हटकले तरी चालक वाहनात असताना दंड कसा करतात म्हणून हुज्जत घातली जाते असा अनुभव एका वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याने 'लोकसत्ता'कडे कथन केला. अशीच परिस्थिती उरण शहर, उरण जेएनपीटी व जेएनपीटी किल्ले गावठाण मार्गालगत अंतर्गत भागात, पनवेल बस स्थानक परिसर, शहरांतर्गत रस्ते, कच्छी मुहल्ला, कळंबोली सर्कल नजीकचा परिसर या ठिकाणीही

> शहरात बेशिस्त वाहन चालवणे आणि बेशिस्त पार्किंगमुळे सर्वाधिक वाहतूक कोंडी होते. त्यामुळे कुठलीही पूर्व सूचना न देता ही कारवाई अचानक करण्यात आली होती. येत्या काही दिवस अशीच कारवाई करण्यात येणार आहे. तसेच यात सातत्य राखण्यात येणार आहे. वाहनचालकांनी कृपया वाहतूक नियमांचे पालन करावे.
>
> **-तिरुपती काकडे,** पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा, नवी मुंबई

आहे. ही सर्व परिस्थिती पाहता नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या परिसरात वाहतूक पोलिसांनी बेशिस्त पार्किंग करणाऱ्यांच्या विरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे.

या मोहिमेंतर्गत, वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे आणि नो-पार्किंगमध्ये उभे असलेले वाहनांवर कारवाई करण्यात आली. गुरुवारपासून या मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. पहिल्याच दिवशी या मोहिमेदरम्यान गुरुवारी आणि शुक्रवारी मिळून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील वाहतूक विभागाने वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे तीन हजार २९७ वाहनावर कारवाई करण्यात आली आहे. यात गुरुवारी केलेल्या कारवाईत एक हजार ८४९ तर शुक्रवारी एक हजार ४४८ बेशिस्त वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

गुरुवार आणि शुक्रवारी केलेल्या कारवाईत सर्वाधिक कारवाई कळंबोली येथे ४२७ तर सर्वात कमी गव्हाण फाटा येथे ५४ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. वाशी १४९, एपीएमसी २०६, रबाळे, १५३, महापे १७३, कोपरखैरणे ३०५, तुर्भे ३९५, सीवुड्स १५०, सीबीडी १६२, खारघर १८६, कळंबोली ४२७, तळोजा ७३, पनवेल शहर २६५, नवीन पनवेल ६८, उरण ४०९, न्हावाशेवा १३८, गव्हाणफाटा ५४ एकूण तीन हजार २९७.

---

# शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत २०० लिटर प्लास्टिक ड्रमचे वाटप



**उरण : प्रतिनिधी**

डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत निसर्गमित्र नैसर्गिक शेती गट, विकास नैसर्गिक शेती गट व प्रगती नैसर्गिक शेती गटांना कृषी विभाग उरण मार्फत चिरनेर उरण येथे शेतकऱ्यांना जिवामृत, बिजामृत व दशपर्णी अर्क तयार करण्याकरीता तहसिलदार डॉ. उद्धव कदम तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ - नारनवर, सरपंच भास्कर मोकल, महाराष्ट्र शासनाचे शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, पोलीसपाटील संजय पाटील यांच्या हस्ते २०० लिटरच्या प्लास्टिक ड्रमचे वाटप करण्यात आले.

या वेळी तहसिलदार डॉ. उद्धव कदम मार्गदर्शन म्हणाले की, सेंद्रिय शेतीमध्ये मातीची गुणवत्ता सुधारते. सेंद्रिय शेतीमध्ये शाश्वतता, मातीची सुपीकता व जैविक विविधता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजे.

उरण तालुक्यात कृषी विभागामार्फत डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत ५०० हेक्टर क्षेत्रावर ३६ गटांची स्थापना करण्यात आली आहे. या ३६ गटांना सेंद्रिय निविष्ठा म्हणजे जिवामृत, बीजामृत व दशपर्णी अर्क घरच्या घरी तयार करता यावेत यासाठी कृषी विभागामार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

या गटांच्या माध्यमातुन सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर थांबविणे, जमिनीची सुपीकता वाढविणे व आरोग्य सुधारणे, तसेच सेंद्रिय मालाची उत्पादन व विक्री करुन ग्राहकांना रसायनमुक्त धान्य देणे हा प्रमुख उद्देश आहे. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत सेंद्रिय निविष्ठा तयार करण्याकरीता उरण तालुक्यात ३६ गटांना ड्रम खरेदी न करता कृषी विभागामार्फत अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे.

---

# मद्यपी वाहनचालकांना वाहतूक पोलिसांचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात मागील काही महिन्यात मोटरसायकल अपघातात अधिक वाढ झाली असून, या अपघातात तरुणांची संख्या अधिक आहे. यामध्ये बऱ्याच निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहे.

मागील वर्षांपासून ते आत्तापर्यंत १९० मोटरसायकल व जड अवजड वाहन चालवणाऱ्या चालकांवर मद्य प्राशन करून गाडी चालविल्यामुळे दंडात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत आहे.

उरण तालुक्यासह उरणला जोडलेल्या बहुतांशी गावामध्ये ग्रामदैवता यात्रा व पालखी सोहळ्यांना प्रारंभ झाला आहे. तालुक्यातील नागरिकांनी सुरु झालेल्या यात्रा, पालखी उत्सवासाठी जातांना आपली वाहने सुरक्षित रित्या चालवून मार्गक्रमण करावे. आपण यात्रा व पालखीचा आनंद साजरा करा, परंतु हा आनंद साजरा करीत असतांना कोणीही कोणत्याही प्रकारची नशा मद्यपान करून वाहन चालवू नये.

विशेष करून मोटार सायकल चालवून अपघातास कारणीभूत होऊ नका, अशी सूचना उरण वाहतुक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे व न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम. मुजावर यांनी उरण वासियांना केली आहे.

---

# शाळा प्रवेशामध्ये स्थानिकांना प्राधान्य द्या

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स सेक्टर ५०(जुने) येथे महानगपालिका शाळा क्रं ९३ येथे पहिली ते आठवीच्या प्रवेश प्रक्रिया सुरू असून एकूण १८२ जागासाठी ५३९ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर शाळा क्रं ९३ सीवूड्स-करावे व्यतिरिक्त अनेक विभागातून प्रवेश मिळाल्याची अनेक प्रकरणे आहेत. त्यामुळे स्थानिक तसेचं भूमिपुत्र यांना दरवर्षी शाळा प्रवेशापासून वंचित रहावे लागत आहे. तिथे स्थानिकांना प्रधान्य मिळाले पाहिजे, अशी मागणी भाजपाचे दत्ता घंगाळे यांनी शिक्षण उपायुक्तांकडे केली आहे.




सीवूड्स विभागात भूखंड क्रं ८अ सेक्टर ३० येथे महानगरपालिकेची शाळेची इमारत धूळ खात उभी असून ती सुरू करून तेथे वर्ग सूरू केल्यास प्रवेश घेण्यासाठी वाट पाहत असलेल्या शेकडो विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो असे घंगाळे यांनी पत्रात म्हटले आहे. शाळा क्रं ९३ मधील नवीन इमारतीत तयार असलेले वर्ग सुरू करण्याची मागणी घंगाळे यांनी केली.

---

# उरण येथे आज राम जन्मोत्सव

**उरण : वार्ताहर**

राम नवमीनिमित्त रविवारी (दि.६) उरण बाजारपेठेतील श्री राम मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असे मंदिराचे ट्रस्टी चंद्रकांत ठक्कर यांनी सांगितले.

सकाळी ६ वाजता काकड आरती, ७.१५ वाजता आरती, सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत कीतर्नकार ह.भ.प.सुधीर बाळ (डोंबिवली) यांचे कीर्तन, दुपारी १२.४० वाजता श्रीराम जन्म, १२.५०वाजता नहाणी, दुपारी १ वाजता पाळणा, दुपारी १.१० वाजता आरती, सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत भजने, श्री गुजराती महिला सत्संग मंडळ आदींचे कार्यक्रम होणार आहेत. रात्री ९ ते १०.३० वाजेपर्यंत पालखी मिरवणूक श्री गजाजन प्रासादिक भजन मंडळ यांची पालखी सोबत भजने आदी होणार आहेत.

या कार्यक्रमास उरण विधानसभा आमदार महेश बालदी, चंद्रकांत ठक्कर, कौशिक शहा, निलेश ठक्कर, वसंत ठक्कर, सदानंद गायकवाड, विक्रम ठक्कर यांच्या सह सर्व सदस्य, हितचिंतक, समाजसेवक, आदींचे सहकार्य मिळणार आहे, असे आयोजकांनी सांगितले.

---

# डॉ. बाबासाहेबांचा विचार मानव कल्याणाचा -प्रा.वानखेडे

**नवी मुंबई : बातमीदार**

महामान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार हा मानव कल्याणाचा विचार असून समर्थ राष्ट्रनिर्माणासाठी सामाजिक न्यायाचे धोरण राबवितांना त्यांनी सर्वांच्या समान हक्कासाठी पुढाकार घेतला. संविधानाच्या माध्यमातून सर्वांना समान न्याय देताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विशेषत्वाने महिलांना समानतेचा हक्क देण्याची जगातील पहिली सुरुवात भारतापासून केली हे त्यांचे कार्य क्रांतीकारी असून जातीअंताचा लढा हा स्वराज्याचा लढा आहे ही त्यांची भूमिका द्रष्टेपणाची असल्याचे, मत सुप्रसिध्द व्याख्याते डॉ. हरीश वानखेडे यांनी व्यक्त केले.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून पंधरवडा कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'जागर २०२५' या व्याख्यानमालेतील 'सामाजिक न्याय व समानता' हे शुभारंभाचे व्याख्यानपुष्प सुप्रसिध्द लेखक, व्याख्याते डॉ.हरीश वानखेडे यांनी गुंफले.

नवी मुंबई महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे बाबासाहेबांची वैचारिक उत्तुंगता समजून घेण्यासाठी अत्यंत सुयोग्य स्थान असून इथे आल्यानंतर भारावल्यासारखे होते अशा शब्दात व्याख्याते डॉ.हरीश वानखेडे यांनी स्मारकाविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. येथील ग्रंथालय ही सर्वात महत्त्वाची उपलब्धी असल्याचे सांगतानाच त्यांनी येथील संग्रहालयातील बाबासाहेबांची दूर्मिळ छायाचित्रे पाहताना बाबासाहेब आणखी समजत जातात, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकापासून अभ्यासकांपर्यंत सर्वांना हे स्मारक नवी ऊर्जा देते असे ते म्हणाले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विभागप्रमुख उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांनी जयंती महोत्सवानिमित्त जागर व्याख्यानमाला आयोजित करण्याबाबत नागरिकांकडूनच विचारणा होत होती याबद्दल समाधान व्यक्त केले.

आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षीही जागरच्या माध्यमातून नानाविध उपक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले व उत्तम प्रतिसादाबद्दल आभार मानले.

---

# आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडून बाजार समिती सदस्यांसोबत बैठक

## एपीएमसीच्या पुनर्विकासासाठी पुढाकार

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

गेल्या कित्येक वर्षांपासून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचा पुनर्विकास रखडला आहे. दिवसेंदिवस एपीएमसीमधील इमारती जीर्ण झाल्या असून मोडकळीस आल्या आहेत. त्यामुळे एपीएमसीचा पुनर्विकास प्रश्न ऐरणीवर आला आहे. याच अनुषंगाने शुक्रवारी वाशी येथील कांदा बटाटा मार्केट येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रभू पाटील यांच्या दालनात बैठक संपन्न झाली.



या वेळी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती हुकूमचंद आमदरे, फळ मार्केटचे संचालक संजय पानसरे, कांदा बटाटा मार्केटचे संचालक अशोक वाळूंज, भाजी मार्केटचे संचालक शंकर पिंगळे, अप्पर निबंधक सह संस्था तथा सचिव डॉ.पी.एल. खंडागळे, शशी भानुशाली, पांडुरंग आमले, सुधीर आंग्रे, दत्तात्रेय दुबे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

एपीएमसीचा पुनर्विकास करतेवेळी विकासक कोण असावा व कसा असावा त्याची काम करण्याची पात्रता आहे की नाही त्याचे काम उत्कृष्ट दर्जाचे आहे की नाही या सर्व गोष्टींचा विचार करूनच पीएमसी नेमावी, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी उपस्थितांना सांगितले. त्याचबरोबर विकासक हा आपल्याला वेळेत काम पूर्ण करून देणारा व कामाची गुणवत्ता देणारा असावा. तसेच नवी मुंबईमधील वाशी विभागात इमारती तोडून ठेवलेल्या आहेत आणि अजूनपर्यंत काम चालू नाही व लोकांना भाडेही मिळत नाही या सर्व गोष्टींची माहिती घ्यावी.

बैठकीत एपीएमसीमधील रस्त्यांची समस्या, अनधिकृत फेरीवाले अशा विविध प्रश्नाबाबत सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली तसेच मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रभू पाटील यांच्या सानिध्यात एपीएमसीचा पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला पाहिजे व एपीएमसी पुनर्विकासाबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

---

# खारघरमध्ये डायलिसिस सेंटरचे उद्घाटन





**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनने आरोग्यसेवेत, खारघरमध्ये एका नवीन युगाची सुरुवात केली. गुढीपाडवाच्या निमित्त, सामुदायिक आरोग्यसेवेतील एक नवीन अध्याय लिहिला गेला. रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनअभिमानाने त्याचे दीर्घकाळापासून प्रेम असलेले रोटरी डायलिसिस सेंटरचे उद्घाटन केले.

खारघर येथील डी-मार्ट जवळील सेक्टर १५ येथील खारघर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या दुसऱ्या मजल्याचे औपचारिक उद्घाटन डीजीई आरटीएन संतोष मराठे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. क्लबचे अध्यक्ष आरटीएन शैलेश पटेल, सर्व माजी अध्यक्ष, खारघर भाजप पदाधिकारी व क्लबचे सर्व सदस्यआणि अन्य मान्यवर पाहुणे उपस्थित होते.

अत्याधुनिक सुविधा असलेले हे केंद्र सध्या सुसज्ज आहे. वार्षिक ५,००० डायलिसिस सायकल क्षमता असलेल्या तीन पूर्णपणे स्वयंचलित फ्रेसेनियस काबी डायलिसिस मशीनसध्या लावण्यात आले.

विस्तारित करण्याच्या योजना आधीच अस्तित्वात आहेत, अजून सहा मशीन्स लावण्यात येईल, ज्यामुळे ही जीवनरक्षक सेवा गरजू रुग्णांपर्यंत पोहचेल, अशी माहिती अध्यक्ष शैलेश पटेल यांनी दिली.

केवळ वैद्यकीय सुविधा नसून, रोटरी डायलिसिस सेंटरआहे एकआशेचा किरण, दर्जेदार आणि परवडणारी डायलिसिस सेवा ही सर्वांना उपलब्ध होईल याची खात्री रोटरीचे प्रोजेक्ट डायरेक्टर रवी किरण यांनी दिली.

---

# कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कोपरखेरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत एस.एस.टाईप, रूम नं १४९, सेक्टर -७, कोपरखैरणे, नवी मुंबई. यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये २० फेब्रुवारी २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. बांधकामावर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली.

कोपरखैरणे रेल्वेस्टेशन येथील सेक्टर-९, बालाजी सिनेमा समोरील फुटपाथवरील बेघर लोकांचे सामान जप्त करून डम्पिंग येथे जमा केले व कोपरखैरणे सेक्टर १ येथील २ झोपडपट्ट्या हटविण्यात आल्या. अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते.

---

# पनवेलमधील स्वामी समर्थांच्या मठात दिग्दर्शक केदार शिंदेंनी घेतले दर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रसिद्ध सिने-नाट्य दिग्दर्शक केदार शिंदे यांनी शुक्रवारी (दि. ४) पनवेलमधील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठाला भेट देऊन स्वामी समर्थांचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी पत्रकार साहिल रेळेकर हेदेखील त्यांच्यासमवेत उपस्थित होते.

मठाधिपती सुधाकर घरत यांनी दिग्दर्शक केदार शिंदे यांचे स्वागत करून अक्कलकोट निवासी स्वामी समर्थ मठातील लघुरुद्राभिषेक केलेल्या पादुका भेट स्वरूपात दिल्या. या वेळी अवधूत घरत, कांचन सुतार, परेश गुरव, महेश सुतार, घरत परिवार आदी उपस्थित होते.




जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्मात्या ज्योती देशपांडे, निर्मात्या बेला केदार शिंदे आणि केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक' हा सिनेमा येत्या २५ एप्रिल रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात रीलस्टार आणि 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण मोठ्या पडद्यावर झळकणार आहे.

या धर्तीवर केदार शिंदे यांनी पनवेलमधील श्री स्वामी समर्थांच्या मठात स्वामींचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी उपस्थित स्वामी भक्तांनीही चित्रपटाच्या यशासाठी केदार शिंदे यांना शुभेच्छा दिल्या.

# सुधागडात अवकाळी पावसाचा धुमाकूळ

## आंबा पीक व बागायतीचे नुकसान; दर्यागाव जि.प. शाळेची पडझड





**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील अनेक गावांना शुक्रवारी सायंकाळी अवकाळी पावसाने झोडपले. यामुळे येथील आंबा पीक व बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच दर्यागाव जिल्हा परिषद शाळेची पडझडदेखील झाली आहे. सुदैवाने शाळेत मुले नसल्यामुळे मोठा अनर्थ टळला. तालुक्यातील नाडसूर, धोंडसे, पाच्छापूर, दर्यागाव, कळंब व इतरही अनेक गावात वादळी पावसाने धुमाकूळ घातला. आंबा बागायतदारांचे हातातोंडाशी आलेले पीक अक्षरशः जमीनदोस्त झाले तसेच ज्या आंबा बागायती होत्या तेथील आंबा कलमांचेदेखील नुकसान झाले आहे. हे नुकसान लाखोंच्या घरात असण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील आंबा बागायतदार व शेतकरी हवालदिल झाला असून शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी करीत आहे.

याशिवाय दर्यागाव येथील जिल्हा परिषद शाळेची पडझड झाली. पत्रे उडाले, भिंतीला तडे गेले. तालुक्यात विविध गावांमध्ये अशा प्रकारे अवकाळी वादळी पावसामुळे नुकसान झाले आहे. अनेक शेतकरी व ग्रामस्थ शासनाकडे या संदर्भात माहिती देत आहेत.

**अवकाळी वादळी पावसामुळे सुधागड तालुक्यात अनेक आंबा बागायतदार व शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी घरांचे व शाळेचेदेखील नुकसान झाले आहे. शासनाने तत्काळ या नुकसानीचे पंचनामे करून शेतकरी व बागायतदारांना तसेच नागरिकांना योग्य तो मोबदला द्यावा.**

**–ऋषी झा, कृषी सल्लागार, पाली**

# महाड आगारात साचले पाणी

## प्रवाशांचे हाल

**महाड : प्रतिनिधी**

अवकाळी पावसाच्या पहिल्याच सरीने महाड एसटी आगाराला तलावाचे स्वरूप आले. यामुळे प्रवाशांना या पाण्यातून वाट काढत एसटी बस पकडावी लागली. प्रवाशांनी व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

मुंबई–गोवा महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या ऐतिहासिक महाड शहरातील एसटी आगारात काही दिवसांपूर्वी कॉंक्रीटचे काम करण्यात आले. एसटी स्थानकाच्या चहुबाजूने भराव आणि इमारती झाल्याने या ठिकाणी कायम पाणी साचण्याचे प्रकार घडत होते. यामुळे आगारामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या निधीतून कॉंक्रीटकरण करून उंचवटा निर्माण करण्यात आला. ज्या ठिकाणी मुंबई आणि लांब पल्ल्याच्या गाड्या उभ्या राहतात त्या ठिकाणी हा उंचवटा केल्यामुळे आगारातील आतील बाजूस आणि स्थानकाच्या जुन्या इमारतीमधील भागामध्ये अवकाळी पावसामुळे पाणी तुंबून राहिले. पाणी एकाच ठिकाणी साचून राहिल्याने ऐन उन्हाळ्यात आगारात चिखलाचे साम्राज्य पसरले. ऐन उन्हाळ्यात ही परिस्थिती तर पावसाळ्यात महाड आगाराची काय परिस्थिती होईल, असा संतप्त सवाल अनेक व्यवस्थापनाला विचारीत आहेत.

महाड एसटी आगारामध्ये करण्यात आलेले काम हे नियोजनबद्ध नसल्यामुळे शासनाचे पर्यायाने नागरिकांचे लाखो रुपये पाण्यात गेले आहेत. आगारातील मोजकाच भाग कॉंक्रीटीकरण कामामुळे उतार निर्माण होऊन अन्य भागामध्ये पाणी तुंबून राहिले आहे. हे काम सुरू असतानाच अनेकांनी याबाबत महाड एसटी आगाराला सूचना दिल्या होत्या, मात्र प्रशासनाने या सूचनांकडे दुर्लक्ष करत लाखो रुपयांची उधळण केल्याचे बोलले जात आहे.



# जात वैधता प्रमाणपत्र वेळेत मिळण्याकरिता समता पंधरवडा विशेष मोहीम

**रायगड : रामप्रहर वृत्त**


मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र वेळेत मिळावे, याकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून १ ते १५ एप्रिल या कालावधीत समता पंधरवडा ही विशेष मोहीम सुरू असून याचा लाभ मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती रायगड जयंत चाचरकर यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी राज्यात विशेष मोहिम राबविणेत येत आहे. इयत्ता अकरावी व बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या तसेच अभियांत्रिकी पदविका शिक्षण घेत असलेल्या व पुढील उच्च शिक्षणाकरिता व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र न मिळाल्याने बरेचदा मागासवर्गीय विद्यार्थ्यास प्रवेशापासून वंचित राहण्याची परिस्थिती उद्भवते.

वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी समितीस पुरेसा अवधी मिळावा, तसेच जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यापासून वंचित राहू नये यास्तव ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज सादर केलेला नाही अशा विद्यार्थ्यांनी ज्या जिल्ह्यातून जात प्रमाणपत्र मिळवले आहे त्या जिल्ह्याच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्वरित अर्ज सादर करावेत. ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत, परंतु अद्याप वैधता प्रमाणपत्र मिळाले नाहीं अशा विद्यार्थ्यांनी समिती कार्यालयात हजर राहून त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती रायगड जयंत चाचरकर यांनी केले आहे.

# तरुण बेपत्ता

**माणगाव : बातमीदार**



माणगाव तालुक्यातील पोटणेर आदिवासीवाडी येथील रूपेश देवचंद वाघमारे (वय २६) हा मोलमजुरी करणारा तरुण पत्नी प्रियांका हिला मी कामानिमित्त बाहेर जात असून पुढील आठवड्यात परत येतो असे सांगून मोटरसायकल (एमएच ०६ सीएन ३८२४) घेऊन गेला. तो अद्यापपर्यंत परत आला नाही. याबाबत रूपेशच्या पत्नीने आपला पती हरवल्याची तक्रार माणगाव पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार तक्रार दाखल करण्यात आली आहे.

रूपेशचा चेहरा गोल, उंची पाच फूट, रंग सावळा, केस काळे, अंगाने मध्यम, अंगात लाल रंगाचा शर्ट, काळी रंगाची पॅन्ट, पायात काळे बूट असे वर्णन असून हा तरुण कुठे मिळून आल्यास माणगाव पोलीस ठाण्यात कळविण्यात यावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# रेवदंड्यातील सुरूचे बन बनले मद्यपींचा अड्डा

## ग्रामस्थ संतप्त, अनधिकृत टपऱ्यांवर कारवाईची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**


रेवदंडा हरेश्वर मार्गातील समुद्र किनारी स्थनिक, पर्यटक, पै–पाहूणे यांना विरगुंळा म्हणून उभारलेल्या सुरू व माड बनात सध्या रात्रीच्या वेळी मद्यपी आपला कार्यभाग साधत आहेत. त्यामुळे तेथे रात्री उशिरापर्यंत व्यवसाय करणाऱ्या अनधिकृत टपऱ्या हटविण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत.

रेवदंडा हरेश्वर मार्गातील समुद्र किनारी सुरू व माड बनात अनेक जण रात्री उशिरापर्यंत दारू व बियर यांचे घशात रिचवित वेगळाच तमाशा सुरू असतो. रेवदंडा सुरू, माड बन मद्यपीचा अड्डा बनला असून रात्रीस उशिरापर्यंत धुडगूस घातला जातो. सकाळी तेथे दारू व बियर बाटल्यांचा खच पडल्याचे दिसून येते.

येथे बसण्यासाठी असलेले बेंचेसवरसुद्धा दारू व बियरच्या बाटल्यासह चकण्याची घाण टाकलेली असते. रात्रीच्या यामुळे येथे येणार्या स्थानिक, पर्यटक, व पै–पाहूणे यांच्या सुविधेसाठी बनविण्यात आलेल्या सुरू व माड बनात गलिच्छपणा जाणवतो, तर विरगुंळा म्हणून बसण्यासाठी आलेल्यांचाही हिरमोड होतो. या ठिकाणी पोलीस रात्रीच्या वेळेस फेरफटका मारत नसल्याने मद्यपींचे फावले आहे.

या ठिकाणी स्थानिकांसाठी विशेषतः महिलावर्गासाठी वातावरण भीतीयुक्त बनले आहे. याबाबत रेवदंडा ग्रामपंचायतीमध्ये संपर्क केला असता अनधिकृत टपऱ्या उभारण्यासाठी अथवा बांधण्यासाठी कोणतीही परवानगी दिली गेलेली नाही. फक्त फिरत्या हातगाडीवाल्यांना व्यवसायास परवानगी दिली गेली असल्याचे सांगण्यात आले.

या अनधिकृत टपऱ्या हटविण्यात याव्यात, जेणेकरून रात्रीस सुरू व माड बनात होत सुरू असलेले मद्यपीचे अड्डे बंद होतील, अशी मागणी येथील स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत.



# चौक मुख्याध्यापिका कांता पुजारी यांची सेवापूर्ती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विद्याप्रसारिणी सभा चौक संचलित सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर शाळेतील मुख्याध्यापिका कांता शिवाजी पुजारी यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख अतिथी माजी विस्तार अधिकारी सखाराम कवडे यांच्या उपस्थितीत झाला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे उपमुख्याध्यापक दिलीप मोळीक यांनी केले. सेवापूर्ती कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती कांता पुजारी व शिवाजी पुजारी या उभयंतांचा सत्कार संस्थेचे सेक्रेटरी तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष योगेंद्र शहा, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, संचालिका व प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन केला सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक, चौक विभाग शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्था, विद्या मंदिर सारंग, प्राथमिक व शिशु मंदिर चौक, समस्त कवडे परिवार, शाळेच्या माजी विद्यार्थिनी तसेच अनेकांनी वैयक्तिकरित्या भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार केला.

या सत्कार समारंभात सुवर्णा मोरे, सोनाली पाटील, मच्छिंद्र बाविस्कर, निखिलेश देशमुख, ऐश्वर्या पुजारी, प्रकाश पुजारी, सुनंदा ठुबे, सौ. थोरावडे, अशोक कवडे, सुलभा गायकवाड, नरेंद्र शहा, सखाराम कवडे आदींनी सत्कारमूर्तींच्या गौरवार्थ विचार व्यक्त केले. सत्कारमूर्ती पुजारी यांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतील अनुभव कथन करत विद्या प्रसारिणी सभा चौक संस्थेने माझ्यावर विश्वास टाकत ज्ञानदान करण्याची जी संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष योगेंद्र शहा यांनी, शिक्षकांच्या ज्ञानदानातून भावी पिढी घडत असते. त्यामुळे शिक्षकांचे हे योगदान देशासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असते, असे म्हटले.

कार्यक्रमास शाळेचे उपमुख्याध्यापक दिलीप मोळीक, पर्यवेक्षक देवानंद कांबळे, विद्यामंदिर सारंग शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक पंडित पाटील, विश्वनाथ कवडे, अशोक कवडे, बबन लंके, पोलीस इन्स्पेक्टर औटी, पोपट लंके, किरण तळेकर, प्रमिला कवडे, श्री व सौ. थोरावडे, मोहन माने; त्याचबरोबर संस्थेच्या सर्व शाळांमधील शिक्षक बंधू–भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल बडेकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रमेश गायकवाड यांनी मानले.

# युवक हरवला

**माणगाव : बातमीदार**

इंदापूरजवळील घोटवळ येथील पंजाबी ढाबा येथून विकी संतोष लठाठ (वय २४, रा. कनका बु.पो. विशवी, ता. मेहकर, जि.बुलढाणा) हा मित्रांना लघवीला जाऊन येतो असे सांगून गेला तो अद्यापपर्यंत मिळून आला नाही. याबाबत त्याचा भाऊ रवी लठाठ याने हरवल्याची तक्रार माणगाव पोलीस ठाण्यात दिली आहे. पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली आहे.



विकी लठाठ याचा चेहरा उभट, उंची पाच फूट तीन इंच, रंग सावळा, केस काळे, अंगाने मध्यम, अंगात पिवळ्या रंगाचे टी–शर्ट व त्यावर केसरी रंगाचा फुल बाह्याचा शर्ट, काळ्या रंगाची नाईट पॅन्ट, पायात चप्पल आहे. अशा वर्णनाचा युवक आढळून आल्यास माणगाव पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन हवालदार सुरज फडताडे यांनी केले आहे.

# पावसाचे संकेत देणारा बहावा बहरला

**अलिबाग : प्रतिनिधी**

बहावा हे झाड पावसाचे संकेत देणारे झाड म्हणून ओळखले जाते. बहावा लवकर फुलला तर पाऊस लवकर पडतो तसेच तो जास्त बहरला तर पाऊस जास्त पडेल असे सांगितले जाते. निसर्गाचा शॉवर इंडिकेटर म्हणून ओळखला जाणारा बहावा यंदा भरपूर फुलला आहे. सध्या पिवळ्या फुलांनी बहरलेला बहावा मनाला आणि डोळ्याला आनंद देत आहे.

पाऊस पडण्याची चाहूल देणारे विविध वृक्ष, पक्षी निसर्गात आहेत. ते आपल्या कृतीतून पाऊस पडण्याचे संकेत देत असतात. कोकिळेचे गाणे, कावळ्याने घरटे बांधण्यास सुरुवात करणे, पळस व बहावा फुलणे हे पाऊस जवळ आल्याचे संकेत आहेत. दरवर्षी एप्रिलच्या मध्यानंतर फुललेला बहावा मार्च अखेरीसच फुललाय त्यामुळे या वर्षी नैऋत्य मोसमी पाऊस लवकर पडेल असे जाणकार सांगत आहेत.

जंगलातील वृक्ष हे केवळ सावली देत नाहीत तर ते निसर्गातील बदलांची चाहूलही देतात. बहावादेखील त्यापैकी त्यापैकी एक. म्हणूनच त्याला नेचर इंडिकेटर असेही संबोधले जाते. पानझड सरून आता चैत्र पालवी फुटू लागली आहे. सावर, पळस आदी जंगली वृक्ष पाना–फुलांनी बहरू लागलेत. यात पिवळ्या धमक फुलांची माळ असलेला बहावा सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

बहावा फुलल्यानंतर साधारण ४५ ते ५० दिवसांनी पाऊस पडतो असे समीकरण कोकणात मांडला जातो. दरवर्षी एप्रिलच्या मध्यानंतर फुललेला बहावा यंदा मार्च अखेरीसच फुलला आहे. त्यामुळे यंदा पावसाचे आगमन लवकर होईल असा अंदाज बांधला जात आहे.



# लखनऊकडून मुंबईचा पराभव

**लखनऊ : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जायंट्स संघाने मुंबई इंडियन्सविरूद्ध नाट्यमय सामन्यात अखेरच्या षटकात शानदार विजय मिळवला. आवेश खानने अखेरच्या षटकात कमालीची गोलंदाजी करीत मुंबईला पराभवाच्या छायेत लोटले. लखनऊने प्रथम फलंदाजी करीत ८ बाद २०३ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरात मुंबईचा संघ ८ गडी गमावून १९१ धावा करू शकला.

मुंबई इंडियन्सला अखेरच्या षटकात २२ धावांची गरज होती. आवेश खानकडे गोलंदाजी करण्याची जबाबदारी आली. आवेशच्या पहिल्याच चेंडूवर कर्णधार हार्दिक पांड्याने षटकार लगावला. यानंतर हार्दिकने दोन धावा घेतल्या. तिसऱ्या चेंडूवर हार्दिकने धाव घेण्यास नकार दिला. चौथ्या चेंडूवर मोठा फटका मारायला हार्दिक चुकला. पाचव्या चेंडूवर हार्दिकने एक धाव घेतली आणि सहाव्या चेंडूवर धाव मिळाली नाही. पहिल्या चेंडूवर षटकार बसलेला असतानाही आवेश खानने यॉर्कर टाकत उत्कृष्ट गोलंदाजी करत हार्दिकला रोखले.



मुंबई इंडियन्सकडून या सामन्यात नवी सलामी जोडी उतरली होती, जी अपयशी ठरली. रोहित शर्मा गुडघ्याच्या दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर पडला होता. त्यामुळे त्याच्या जागी आलेल्या विल जॅक्सला संधी होती, पण तो अपयशी ठरला. संघाचे दोन्ही सलामीवीर केवळ १७ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतले होते. यानंतर नमन धीर आणि सूर्यकुमार यादव यांनी पलटवार केला आणि आक्रमक फलंदाजी केली. नमनने अवघ्या २४ चेंडूत ४६ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतर सूर्यकुमारने संघाची धुरा सांभाळली.

सूर्याने फॉर्ममध्ये पुनरागमन सुरूच ठेवले आणि अनेक महिन्यांनंतर टी-२० क्रिकेटमधील पहिले अर्धशतक झळकावले, मात्र तिलक वर्मा दुसऱ्या बाजूने संघर्ष करताना दिसला, त्यामुळे मुंबईच्या धावांना ब्रेक लागला. वर्माला अखेरच्या षटकांमध्ये रिटायर्ड हर्ट करण्यात आले. १७व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर आवेश खानने सूर्याची विकेट मिळवून मुंबईला मोठा धक्का दिला, पण कर्णधार हार्दिकने येताच काही मोठे फटके मारून आशा जिवंत ठेवल्या, मात्र संघाला विजय मिळवून देण्यात तो कमी पडला.

अखेरच्या षटकांमध्ये शार्दुल ठाकूर आणि आवेश खान यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनऊ संघाने मुंबईला २०४ धावांचे लक्ष्य गाठण्यापासून रोखले, तर मधल्या षटकांमध्ये फिरकी गोलंदाज दिग्वेश राठीने मुंबईच्या फलंदाजांवर नियंत्रण ठेवले.

तत्पूर्वी फलंदाजी करताना लखनऊने या सामन्यात प्रथम फलंदाजी करत मोठी धावसंख्या उभारली. पुन्हा एकदा सलामीवीर मिचेल मार्शने संघासाठी स्फोटक खेळी खेळली आणि अवघ्या २७ चेंडूत अर्धशतक झळकावले. मार्शने ३१ चेंडूत ६० धावा केल्या. यावेळी एडन मारक्रमच्या बॅटनेही काम केले आणि या सलामीवीराने मोसमातील पहिले अर्धशतक झळकावले. या वेळी निकोलस पूरन अपयशी ठरला, तर कर्णधार पंत सलग चौथ्या सामन्यात फ्लॉप ठरला.

सलामीवीरांनंतर मधल्या फळीत आयुष बडोनीने छोटी, पण तुफानी खेळी खेळली, तर डेव्हिड मिलरने शेवटच्या षटकांमध्ये आक्रमक फलंदाजी करत संघाला २०० धावांच्या पुढे नेले. मुंबईसाठी कर्णधार हार्दिक पंड्याने गोलंदाजीत धुमाकूळ घातला आणि चार षटकांत ३६ धावा देत त्याच्या टी-२० कारकिर्दीत पहिल्यांदाच पाच विकेट घेतल्या.

# पाकिस्तानची हाराकिरी सुरूच!

## वनडे मालिकेत न्यूझीलंडकडून व्हाईटवॉश

**माउंट मौंगानुई : वृत्तसंस्था**




चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत पाकिस्तानच्या संघाने अतिशय सुमार कामगिरी केली. परिणामी त्यांना साखळी फेरीतच गाशा गुंडाळावा लागला. त्यांची खराब कामगिरी अजूनही सुरुच आहे. न्यूझीलंडविरूद्धच्या वनडे मालिकेत पाकिस्तानवर व्हाईटवॉशची नामुष्की ओढवली. पहिले दोन गमावल्यानंतर तिसऱ्या सामन्यातही न्यूझीलंडने पाकिस्तान क्रिकेट संघाचा पराभव केला.

बे ओव्हल येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या सामन्यात किवी संघाने ४३ धावांनी विजय मिळवला आणि मालिका ३-०ने जिंकली. पावसामुळे हा सामना ४२ षटकांचा करण्यात आला होता. हवामान लक्षात घेऊन पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद रिझवानने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करीत २६५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात पाकिस्तानी संघ केवळ ४० षटकांत २२० धावांवर ऑलआउट झाला. न्यूझीलंडकडून बेन सियर्सने शानदार गोलंदाजी केली आणि पाच विकेट्स घेतल्या.


पावसामुळे कमी करण्यात आलेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने १६४ धावात चार बळी गमावले होते. त्यामुळे मोठी धावसंख्या गाठणे कठीण वाटत होते, पण कर्णधार मायकेल ब्रेसवेलने ४० चेंडूत ५९ धावा केल्या. त्याच्या स्फोटक फलंदाजीमुळे किवी संघाने ४२ षटकांत २६४ धावा केल्या. या आव्हानाचा बचाव करताना, बेन सीयर्सने पाकिस्तानी फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्याने नऊ षटकांत फक्त ३४ धावा देऊन पाच विकेट्स घेतल्या. संपूर्ण मालिकेत सियर्सने उत्कृष्ट गोलंदाजी केल्याने त्याला मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आले.

२६५ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानला तिसऱ्या षटकात मोठा धक्का बसला. पाकिस्तानी संघाने विकेट गमावली नाही, पण दुखापतीमुळे सलामीवीर इमाम उल हक दुखापतीमुळे मैदानाबाहेर गेला. त्याच्या जागी उस्मान खानला 'कन्कशन सब' म्हणून खेळवण्यात आले. यानंतर बाबर आझम-अब्दुल्ला शफीक यांनी डाव सावरवण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानला पहिला धक्का १७व्या षटकात ७३ धावांवर बसला आणि त्यानंतर संपूर्ण डाव गडगडला. पाकिस्तान संघाला कोणतीही मोठी भागीदारी करता आली नाही. शफीक बाद झाल्यानंतर पाच षटकांनंतर उस्मान खानही बाद झाला. पाठोपाठ बाबरदेखील माघारी परतला. पाकिस्तानचा निम्मा संघ १६९ धावांवरच बाद झाला होता. यानंतर उर्वरित फलंदाजांनी एकूण ५२ धावा केल्या. त्यामुळे चांगली सुरुवात करुनही पाकिस्तानची फलंदाजी २२१ धावांवर संपुष्टात आली.

# तिलक वर्माला मैदानाबाहेर पाठवल्याने सूर्या संतापला

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या नव्या हंगामाची सुरुवात मुंबई इंडियन्ससाठी पुन्हा एकदा निराशाजनक होताना दिसत आहे. लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात मुंबई संघामध्ये ताळमेळ दिसून आला नाही. १९व्या षटकात तिलक वर्माला अचानक मैदानाबाहेर पाठविण्यात आले. या निर्णयानंतर कर्णधार हार्दिक पांड्या आणि प्रशिक्षकांवर टीका होत आहे. खुद्द फलंदाज सूर्यकुमार यादवनेही डगआऊटमध्ये आश्चर्ययुक्त प्रतिक्रिया दिली.



## प्रशिक्षक जयवर्धनेंनी काढली समजूत

१९व्या षटकात तिलक वर्माला बाहेर पाठविल्यानंतर जिओ हॉटस्टारवर समालोचन करणाऱ्या माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग, विरेंद्र सेहवाग आणि मोहम्मद कैफ यांनीही आश्चर्य व्यक्त केले. तिलक वर्माच्या जागी मिचेल सँटनरला मैदानात पाठवले होते. तोही मोठे फटके खेळण्यासाठी ओळखला जात नाही.

तिलक वर्मा अचानाक मैदानातून बाहेर येत असल्याचे पाहून सूर्यकुमार यादवने आश्चर्य व्यक्त केले आहे. सामन्याचे थेट प्रक्षेपण सुरू असताना सूर्यकुमारची प्रतिक्रिया कॅमेऱ्यात कैद झाली आहे. हे काय चालले आहे? असे हात वर करून सूचक विधान त्याने केले. यानंतर नाराज झालेल्या सूर्यकुमारची समजूत घालण्यासाठी प्रशिक्षक महेला जयवर्धने पुढे सरसावले आणि त्यांनी त्याच्या कानात पुटपुटत या निर्णयाची माहिती दिली.

मुंबई इंडियन्स संघात भारतीय क्रिकेट संघाचे दोन विद्यमान कर्णधार खेळत आहेत. भारताच्या एकदिवसीय आणि कसोटी क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली खेळत आहेत. २०२४च्या हंगामात रोहित शर्माला कर्णधार पदावरून बाजूला करत हार्दिक पांड्याला कर्णधार करण्यात आले होते. त्या वेळी जशी संघाच्या निर्णयावर टीका केली गेली, तशीच टीका तिलक वर्माला बाहेर पाठवल्यामुळे होत आहे.

# यशस्वी जैस्वालने मुंबई संघ सोडण्यामागे कारण वेगळेच?

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलचा माहोल सगळीकडे असताना भारताचा युवा फलंदाज यशस्वी जैस्वाल सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. यशस्वीने डॉमेस्टिक क्रिकेटमधील चॅम्पियन संघ मुंबईची साथ सोडली असून आता तो गोवा क्रिकेट संघाकडून खेळताना दिसणार आहे. गोवा क्रिकेट संघाने त्याला कर्णधारपदाची मोठी ऑफर दिली आहे, पण यादरम्यान एक धक्कादायक रिपोर्ट आता समोर आला आहे.

यशस्वी जैस्वालने मुंबई क्रिकेट असोसिएशनला ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता की, येता हंगाम म्हणजेच २०२-२६ च्या एलिट ग्रुप सामन्यांमध्ये तो गोवाकडून खेळणार आहे. यशस्वीने एक मुलाखतीत त्याच्या मुंबई सोडून जाण्यामागचे कारण स्पष्ट केले होते. अशात एका रिपोर्टमुळे चर्चांना उधाण आले आहे.



रिपोर्टमध्ये अजिंक्य रहाणे आणि यशस्वी जैस्वाल यांच्यातील वादाचा उल्लेख करण्यात आला आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशन मुख्यत: संघाचा कर्णधार अजिंक्य आणि यशस्वीमध्ये मतभेद असल्याचे म्हटले आहे. या रिपोर्टमध्ये असेही सांगण्यात आले आहे की, यशस्वीने रागाच्या भरात कर्णधार अजिंक्यच्या किट बॅगला लाथडले होते. ही घटना बीकेसीच्या मैदानावर झालेल्या जम्मू काश्मीर विरुद्ध मुंबई या सामन्यात घडली होती.

रणजी ट्रॉफीमध्ये मुंबईला जम्मू आणि काश्मीरकडून मोठा पराभव पत्करावा लागला होता, ज्यात यशस्वी हा पूर्णपणे अपयशी ठरला होता. या सामन्यादरम्यान त्याने कर्णधार अजिंक्यच्या किटला लाथ मारली. त्यामुळे रहाणे संतापला. या पराभवासाठी रहाणे आणि प्रशिक्षक ओंकार साळवी यांनी यशस्वीला लक्ष्य केलाचा दावा रिपोर्टमध्ये केला जात आहे. या दोघांनी यशस्वीच्या वचनबद्धतेवर प्रश्न उपस्थित केले, ज्यामुळे तो नाराज होता.

अहवालात असेही म्हटले आहे की, भारताच्या कसोटी संघात सलामीवीर म्हणून यशस्वीने आपले स्थान पक्के केल्यानंतर गेल्या काही वर्षांत मुंबईसाठी त्याच्या मर्यादित कामगिरीबद्दल सतत होत असलेल्या चर्चेमुळे त्याने हा निर्णय घेतला.

### ...तेव्हा मैदान सोडायला लावले होते!

मुंबई कर्णधार अजिंक्य रहाणे आणि यशस्वी जैस्वाल यांच्यातील हा वाद काही पहिल्यांदाच झाला नव्हता. यापूर्वी २०२२च्या दुलीप ट्रॉफीमध्ये रहाणेने यशस्वीला संघाबाहेर केले होते. २०२२ साली दुलीप ट्रॉफीचा अंतिम सामना होता. पश्चिम विभागाचा कर्णधार असलेला अजिंक्य अचानक संतापला, कारण क्षेत्ररक्षण करत असलेला यशस्वी हा विरोधी फलंदाज रवी तेजाला स्लेज करत होता. अजिंक्यने यशस्वीला स्लेजिंग करताना पाहिले तेव्हा त्याने त्याला मैदान सोडण्यास सांगितले. यशस्वीने कर्णधाराची आज्ञा पाळली आणि मैदान सोडले होते.

# भारताविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेतून इंग्लंडचा दुखापतग्रस्त गोलंदाज ऑली स्टोन 'आऊट'

**लंडन : वृत्तसंस्था**

भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी इंग्लंड संघाला मोठा धक्का बसला आहे. त्यांचा वेगवान गोलंदाज ऑली स्टोन गुडघ्याच्या दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर पडला आहे. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने याबाबत माहिती दिली.



स्टोनच्या दुखापतीमुळे इंग्लंडच्या अडचणी वाढल्या आहेत, कारण संघाला आधीच कर्णधार बेन स्टोक्स, वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्स आणि मार्क वूड यांच्या दुखापतींचा सामना करावा लागत आहे. स्टोनने २०२१मध्ये भारताविरुद्ध चेन्नईमध्ये झालेला एक कसोटी सामना खेळला आणि त्यात त्याने चार विकेट्स घेतल्या होत्या.

टीम इंडिया जूनमध्ये इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. जिथे दोन्ही संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाईल. पहिला कसोटी सामना २० जूनपासून सुरू होणार आहे.

ईसीबीने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, नॉटिंगहॅमशायरच्या प्री-सीझन दौऱ्यादरम्यान अबू धाबी येथे खेळताना ऑली स्टोनला उजव्या गुडघ्यात वेदना जाणवत होत्या. दुखापत गंभीर असल्याचे रिपोर्टमधून समोर आले. त्यामुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. आता तो किमान आठवडे म्हणजेच साडेतीन महिने खेळू शकणार नाही. यापुढे तो ईसीबी आणि नॉटिंगहॅमशायर वैद्यकीय पथकासोबत फिटनेससाठी काम करेल. ऑगस्टपर्यंत ऑली स्टोन पूर्णपणे तंदुरुस्त होईल अशी अपेक्षा आहे.

# लँगर यांच्या पत्रकार परिषदेत मजेशीर घटना

**लखनऊ** : आयपीएलमध्ये शुक्रवारी झालेल्या लढतीत लखनऊ सुपर जायंट्सने मुंबई इंडियन्स संघाला नमवले. सामन्यानंतर लखनऊचे प्रशिक्षक जस्टीन लँगर पत्रकार परिषदेत बोलत होते. पत्रकारांचे मोबाईल लँगर यांच्यासमोरच्या टेबलावर रेकॉर्डिंगसाठी ठेवले होते. या वेळी जे घडले, ते गमतीशीर होते.

लँगर बोलत असताना एका पत्रकाराच्या फोनवर आईचा कॉल आला. 'आईचा फोन आहे, कोणाची तरी आई कॉल करते आहे. मी फोन उचलू का'? असे लँगर यांनी विचारले. त्यांनी फोन उचलला आणि 'आई, रात्रीचे १२ वाजून गेलेत. मी पत्रकार परिषदेत आहे,' असे बोलून कॉल ठेवला. हॉलमध्ये हास्यकल्लोळाची लाट उसळली.

# आयपीएलमध्ये हार्दिक पांड्याचा विक्रम

## पाच विकेट्स घेणारा ठरला पहिला कर्णधार



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने आयपीएल २०२५मध्ये इतिहास घडवला आहे. मुंबई इंडियन्स संघाचा लखनऊ सुपर जायंट्स संघाने अखेरच्या षटकांमध्ये पराभव करत १२ धावांनी सामना जिंकला. हार्दिकची या सामन्यातील अष्टपैलू कामगिरी व्यर्थ ठरली असली तरी त्याने एक अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे, जो याआधी कोणालाच करता आलेला नाही.

हार्दिक पांड्याने या सामन्यात आपल्या गोलंदाजीत कहर केला आणि एकहाती पाच बळी घेत विक्रम केला. हार्दिकने ऋषभ पंत आणि निकोलस पूरनसारख्या फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले आणि आयपीएलच्या १८ वर्षांच्या इतिहासात कोणत्याच कर्णधाराला न जमलेला दुर्मिळ विक्रम केला आहे.

हार्दिक पांड्या आयपीएलच्या १८ वर्षांच्या इतिहासात एका सामन्यात पाच विकेट घेणारा तो पहिला कर्णधार ठरला. याशिवाय हार्दिकने त्याच्या टी-२० कारकिर्दीत पहिल्यांदाच पाच विकेट्स घेण्याचा विक्रम केला आहे.

# लखनऊचा विजय, पण पंत आणि राठीला 'त्या' चुका महागात!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जायंटस्ने शुक्रवारी घरच्या मैदानावर खेळताना मुंबई इंडियन्सवर १२ धावांनी विजय मिळवला, मात्र, सामना संपल्यानंतर लखनऊ संघाचा कर्णधार ऋषभ पंत याच्यावर बीसीसीआयने १२ लाख रुपयांचा दंड ठोठावला. याशिवाय आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल लेगस्पिनर दिग्वेश राठीला सलग दुसऱ्यांदा त्याच्या मॅच फीच्या ५० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

आयपीएलने जारी केलेल्या पत्रात म्हटले आहे की, लखनऊ संघाचा कर्णधार ऋषभ पंत याच्यावर मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळलेल्या १६व्या सामन्यात स्लो ओव्हर रेट राखल्यामुळे दंड करण्यात आला आहे. ऋषभ पंतचा या हंगामातील

## बीसीसीआयकडून दंडात्मक कारवाई

पहिला गुन्हा असल्यामुळे त्याला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

लखनऊ सुपर जायंट्सचा गोलंदाज दिग्वेश सिंह राठी याने मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केले. त्यामुळे त्याच्यावर त्याच्या सामन्याच्या फीच्या ५० टक्के इतका दंड लावण्यात आला आहे. हा त्याचा या हंगामातील लेव्हल १ प्रकारातील दुसरा गुन्हा आहे, त्यामुळे त्याच्या खात्यात दोन डिमेरिट पॉईंट जोडले गेले आहेत. याआधी पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यात त्याच्यावर एक डिमेरिट पॉईंट नोंदवण्यात आला होता.


**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर आवाहन**

पनवेल महानगरपालिकेमार्फत सोमवार, दिनांक ७/०४/२०२५ रोजी लोकशाही दिन मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मुख्यालयात घेण्यात येणार आहे.

ज्या नागरिकांनी लोकशाही दिनामध्ये अर्ज दाखल केला आहे, त्यांनी महानगरपालिका मुख्यालयात सकाळी ११:०० उपस्थित रहावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com